## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 975 नाग/2011

श्री ग्यानिराम मार्तंड जांभुळकर
रा. देऊळगाव(बरे.) पो.बोंडगाव(देवी)
ता. अर्जुनी(मोर.) जि. गोंदिया – 441705 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बी. एन. मडावी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती अर्जुनी(मोर.)
ता. अर्जुनी(मोर.) जि. गोंदिया
2) जन माहिती अधिकारी
पंचायत समिती अर्जुनी(मोर.)
ता. अर्जुनी(मोर.) जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.10.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 6.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 7.2.2011 रोजी जन माहिती अधिकारी पंचायत समिती अर्जुनी(मोर.) जि. गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन बि.आर.जि.एफ. योजने संदर्भात 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना सर्व मुद्यांची अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील खंड विकास अधिकारी पंचायत समिती अर्जुनी(मोर.) यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांच्या वतीने प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती अर्जुनी(मोर.) श्री मडावी हे हजर होते. त्यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 7.2. 2011 चा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती पंचायत समितीच्या संबंधीत विभागा कडून काढण्यात

आली आणि अपीलकर्त्यास सदरची संपूर्ण माहिती दि. 23.2.2011 रोजी उपलब्ध करुन दिली. आणि त्याबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले म्हणून अपीलकर्त्यास माहिती मिळाल्या बाबतची पोच श्री मडावी यांनी आयोगापुढे दाखविली. तथापी याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना माहिती प्राप्त झाली मात्र या योजनेच्या संदर्भात योजना कशा प्रकारे राबविण्यात येत आहे याची माहिती मिळाली नाही. या संदर्भात खंड विकास अधिकारी श्री मडावी यांनी आयोगा पुढे सांगितले की बि.आर.जि. एफ. या योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात त्यांच्या कार्यालयाकडे पुस्तिका उपलब्ध असल्यास ती पुस्तिका किंवा या योजनेच्या शासन निर्णयाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता येईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास बि. आर.जि.एफ. या योजनेच्या संदर्भात पुस्तिका किंवा या योजनेच्या शासन निर्णयाची प्रत विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2316-2317

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 977 नाग/2011**

श्री अशोक मोहनलाल मेश्राम
विनोबा नगर तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री किशोर धोटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा
2) श्री देशमुख
जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता
बांधकाम विभाग नगर परिषद तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.10.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 6.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 14.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता बांधकाम विभाग नगर परिषद तुमसर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सन 1991 पासून ते अर्जाच्या तारखेपर्यंत तुमसर नगर परिषद क्षेत्रात आमदार, खासदार, विधान परिषद सदस्य व शासना मार्फत प्रत्येक वार्ड निहाय किती विकासाची कामे नाल्या, रोड इतर कामे किती केली याबाबत 1 ते 7 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी नगर परिषद तुमसर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता बांधकाम विभाग नगर परिषद तुमसर श्री देशमुख हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद तुमसर श्री किशोर धोटे हे हजर होते.

4. जन माहिती अधिकारी श्री देशमुख यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 14.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 15.1.2011 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सन 1991 पासून ते आजपर्यंत म्हणजे सुमारे 20 वर्षा पूर्वीची माहिती मागितलेली होती. म्हणून अपीलकर्त्यास त्यांनी दि. 11.2.2011 रोजी असे कळविले की आपण मागणी केलेली माहिती ही फार व्यापक स्वरुपाची आहे. आपणास प्रत्यक्षात कोणत्या कामाच्या माहितीची आवश्यकता आहे याबद्यल या कार्यालयास कळवावे. जेणेकरुन

आपणास माहिती पुरविणे शक्य होईल असे अपीलकर्त्यास शिपाया मार्फत पत्र पाठविले. सदरचे पत्र अपीलकर्त्याने स्वीकारले नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. आणि प्रथम अपीलाची सुनावणी दि. 29.3.2011 रोजी घेण्यात आली आणि त्या प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती नगर परिषद कार्यालयात उपलब्ध आहे ती माहिती 15 दिवसात विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला.

5. प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 11.4. 2011 च्या पत्राने त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य अपीलकर्त्यास देण्यात आल्याचे सुनावणीत सांगितले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र त्यांना गुठेवारीची माहिती मिळाली नाही असे त्यांनी नमुद केले. त्यावर जन माहिती अधिकारी आणि मुख्याधिकारी यांनी आयोगा पुढे अपीलकर्त्यास गुठेवारीची माहिती उपलब्ध करुन देण्यास संमती दिली म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास गुठेवारीच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2319-2320

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 825 नाग/2011**

श्री सदानंद रावणजी गणवीर
अंबिका नगर यवतमाळ
ता. जि. यवतमाळ ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय यवतमाळ
ता. जि. यवतमाळ
2) श्री आर. पी. बल्लाड
जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार
तहसिल कार्यालय यवतमाळ
ता. जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.10.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 14.9.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 4.10.2011 रोजी घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 30.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन 1 ते 3 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून 1 आणि 3 मुद्यांची माहिती प्राप्त झाली मात्र मुद्या क्र. 2 च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील तहसिलदार यवतमाळ यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर दि. 28.9.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध झाली. परंतू सदरची माहिती विलंबाने उपलब्ध झाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर शास्तीची कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगाकढे नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री आर. पी. बल्ला हे हजर होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 30.9.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 16.10.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात मुद्या क्र. 2 ची मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध झाली नाही म्हणून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 4.11.2010 च्या पत्राने असे कळविले की आपल्या माहिती अर्जातील मुद्या क्र. 2 ची माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील तहसिलदार यवतमाळ यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 21.1.2011 रोजी निर्गमित करण्यात आला. आणि त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुन्हा दि. 11.2.2011 च्या पत्राने मुद्या क्र. 2 ची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविले. त्यानंतर विद्यमान जन माहिती

अधिकारी हे दि. 19.3.2011 रोजी या पदावर रूजू झाले त्यांनी देखील आयोगा पुढे सांगितले की अपीलकर्त्याने मागितलेल्या मुद्या क्र. 2 च्या माहितीचा शोध तहसिल कार्यालयात घेण्यात आला. तथापी तहसिल कार्यालयात सदरची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून विद्यमान जन माहिती अधिकारी हे जिल्हाधिकारी यवतमाळ कार्यालयात अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यासाठी गेले त्या ठिकाणी जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक शाखेत सदरच्या माहितीचा शोध घेण्यात आला. आणि सदरची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध झाल्यानंतर अपीलकर्त्यास दि. 28.9.2011 च्या पत्राने मुद्या क्र. 2 ची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

4. प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जातील मुद्या क्र. 2 ची मागितलेली माहिती ही तहसिल कार्यालयात उपलब्ध झालेली नव्हती म्हणून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 4.11.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध नाही असे अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत कळविलेले दिसून येते. त्यानंतर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या माहितीचा शोध जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्या कार्यालयात घेतला आणि जिल्हाधिकारी कार्यालयातून सदरची माहिती प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2322-2323

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 981 नाग/2011 व 982 नाग/2011.**

श्री बळीराम पांडूरंगजी वेलेकर
प्लॉट क्र. 27, ग्रिन सिटी गिरड रोड उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री वसंत वासुदेवराव वाघमारे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
विद्या निकेतन उमरेड जि. नागपूर रहाटे ले—आऊट, गॅस गोडाऊन रोड,
आ.ला.वाघमारे शाळेजवळ, उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.10.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.6.2011 रोजी अपील क्रमांक 981 नाग/2011 व अपील क्रमांक 982 नाग/2011 राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. या दोन्ही द्वितीय अपीलांमधील माहितीचा विषय हा एकच आहे आणि माहिती अधिकारी तसेच अपीलकर्ता आणि प्रथम अपीलीय अधिकारी हे देखील एकच असल्यामुळे दोन्ही अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यासाठी आयोगाचे कार्यालयातून दि. 6.9. 2011 रोजी नोटीस काढून दि. 5.10.2011 रोजी दोन्ही द्वितीय अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 6.4.2011 रोजी आणि दि. 14.3.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव विद्या निकेतन उमरेड यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली दोन अर्ज सादर करुन संस्थे विषयी त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दोन्ही अर्जातील काही मुद्यांवरची माहिती प्राप्त झाली मात्र काही मुद्यांवर माहिती प्राप्त झाली नाही. त्याबाबत आज आयोगा समोर जन माहिती अधिकारी तथा सचिव श्री वसंत वासुदेवराव वाघमारे हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर सौ. पतंगे अधिक्षक हया हजर आहेत.

4. जन माहिती अधिकारी श्री वाघमारे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याच्या दि. 6.4.2011 रोजीच्या आणि दि. 14.3.2011 रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन त्यातील काही माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र दोन्ही अर्जातील काही मुद्यांची माहिती त्यांना अद्याप मिळालेली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून अपीलकर्त्याच्या दोन्ही अर्जातील माहितीच्या संदर्भात आयोगा समोर चर्चा करण्यात आली आणि अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांच्या संमतीने असा निर्णय घेण्यात आला की अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयात दि. 10.10.2011 रोजी उपस्थित राहून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी ज्या मुद्यांची माहिती अद्याप पुरविलेली नाही ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या विद्यालयात उपस्थित राहावे. अपीलकर्ता जन माहिती अधिकारी यांच्या विद्यालयात उपस्थित झाल्यानंतर ज्या मुद्यांची माहिती उपलब्ध असेल ती माहिती विनामुल्य अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच ज्या मुद्यांची माहिती उपलब्ध नसेल त्याबाबतची वस्तुस्थिती मुद्येनिहाय अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे वर नमुद केलेले दोन्ही अपीले अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक 981 नाग/2011 व अपील क्रमांक 982 नाग/2011 ही दोन्ही अपीले अंशतः मंजुर करण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता यांनी दि. 10.10.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव यांच्या कार्यालयात सकाळी 11.00 हजर राहून जन माहिती अधिकारी यांच्याशी त्यांना प्राप्त झालेल्या माहिती बाबत चर्चा करावी आणि ज्या मुद्यांची माहिती त्यांना अद्याप प्राप्त झाली नाही ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तथापी ज्या मुद्यांची माहिती उपलब्ध नसेल त्या मुद्यांची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास मुद्येनिहाय कळवावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2325-2326

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 983 नाग/2011**

श्री शंकरराव ओकटूजी मोटघरे
दसरा रोड काशीबाई मंदीराचे पाठीमागे(महाल) नागपूर
ता. जि. नागपूर – 32 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री केदार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा नोंदणी उपमानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
नागपूर विभाग नागपूर
ता. जि. नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक(उ.श्रे.)
नागपूर शहर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.10.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 6.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 5.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 23.2.2011 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांच्या 1) 21 मे 2010 च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची त्यांनी माहिती मागितलेली होती. 2) गैरअर्जदार कार्यालयाने दि. 2. 8.2008 च्या निर्णयाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचे दि. 23.3.2011 च्या पत्राने उत्तर प्राप्त झाले आणि त्यामध्ये असे नमुद केले की मुद्या क्र. 1 च्या संदर्भात दि. 21.5.2010 चे पत्र त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेले नाही म्हणून त्याबाबत कार्यवाही केलेली नाही तसेच मुद्या क्र. 2 च्या संदर्भात त्यांच्या कार्यालयाच्या दि. 2.8.2008 च्या निर्णयाची व कार्यवाहीची प्रत अपेक्षिलेली आहे. तथापी अर्जाचे अवलोकन केले असता सदरचे पत्र हे आपणास सह

दुय्यम निबंधक वर्ग –2 नागपूर शहर क्र.5 नागपूर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये आपण मागितलेल्या माहिती बद्यलचे असल्याने आपणास निश्चित कोणती माहिती हवी आहे याचा अर्थबोध होत नाही असे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कळविले. तथापी या उत्तराने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी श्री पैठणकर हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी श्री केदार हे हजर होते.

4. जन माहिती अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री पैठणकर यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 23.2.2011 चा माहितीचा अर्ज जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांच्या कडून त्यांच्या कार्यालयास दि. 4. 3.2011 रोजी प्राप्त झाला. आणि त्या अर्जाला अनुसरुन दि. 23.3.2011 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. सदरच्या अर्जामध्ये अपीलकर्त्याने त्यांच्या दि. 21.5.2010 च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. तथापी सदरचे पत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाले नाही म्हणून कोणतीही कार्यवाही करता आली नाही अशी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मुद्या क्र. 2 च्या संदर्भात दि. 2.8.2008 चे पत्र हे सह दुय्यम निबंधक वर्ग –2 नागपूर शहर क्र.5 नागपूर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये आपण मागितलेल्या माहितीच्या संदर्भात असल्याचे अपीलकर्त्यास कळविण्यात आले अशी माहिती अपीलकर्त्यास दि. 23.3.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले.

5. दि. 23.3.2011 चे जन माहिती अधिकारी यांचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्त्याच्या दि. दि. 21.5.2010 च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले. त्यावर जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याचे दि. 21.5.2010 चे पत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाले नाही म्हणून प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळी देखील अपीलकर्त्यास दि. 21.5.2010 च्या पत्राची प्रत उपलब्ध करुन देण्याच्या सुचना दिल्या होत्या. तथापी दि. 21.5.2010 च्या पत्राची प्रत त्यांच्या कडे दिली नाही म्हणून त्या संदर्भात कार्यवाही केलेली नाही असे त्यांनी आयोगा पुढे सांगितले.

6. प्रस्तूत प्रकरणी अपीलकर्त्याने दि. 21.5.2010 च्या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांचेकडे आयोगा समोर उपलब्ध करुन दिली म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या दि. 21.5.2010 च्या पत्रावर 30 दिवसात कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या दि. 21.5.2010 च्या अर्जाच्या संदर्भात योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2328-2330

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 980 नाग/2011**

श्री मुस्ताक अहमद व. अब्दूल जब्बार
श्रा. मोमीनपूरा पोली चौकी जवळ, नागपूर
ता. जि. नागपूर – 440018 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुर्यवंशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक
भूमी अभिलेख नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री पी. टी. भूते
जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक
जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.10.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 6.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 5.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 20.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. 1.3.2005 ते 14.6.2010 पर्यंत क्षेत्र दुरुस्ती संबंधी एकुण 1435 प्रकरणे दाखल झाले. त्यापैकी निकाली काढलेल्या 37 प्रकरणाच्या आदेशाच्या प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 17.2.2011 च्या पत्राने माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले. परंतू शुल्काची रक्कम किती भरणा करावी ही रक्कम दिली नाही म्हणून त्यांनी माहितीचे शुल्क भरले नाही.

4. तथापी जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्याने मागितलेल्या 37

प्रकरणाच्या आदेशाच्या प्रती त्यांनी तयार केलेल्या असून अपीलकर्त्यास त्यांनी आयोगा समोर विनामुल्य उपलब्ध करुन दिल्या. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत करुन समाधान व्यक्त केले. अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी विनामुल्य माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2332-2333

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 984 नाग/2011**

श्री बाबुराव मारोत राव मते
प्लॉट नं. 32 बी, इश्वर नगर,
पंडित नेहरू कॉन्व्हेन्ट जवळ नागपूर
ता. जि. नागपूर – 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा व्यवस्थापक
महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्येशीय विकास बॅंक मर्या. मुंबई
15 ए, मोरवी लेन, चौपाटी, मुंबई 400007
2) श्री भालेराव
जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक(तं व क)
महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्येशीय विकास बॅंक मर्या. मुंबई
15 ए, मोरवी लेन, चौपाटी, मुंबई 400007 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.10.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 6.8.2011 रोजी नोटीस काढून दि. 5.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 15.4.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक(तं व क) महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्येशीय विकास बॅंक मर्या. मुंबईयांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा–याची प्राव्हीडंट फंडाची रक्कम व संस्थेच्या अंशदानाची रक्कम याबाबतची कागदपत्रे टिपणी निर्णय प्रक्रियेचा ठराव इत्यादी बाबत माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 19.4.2011 च्या पत्राने असे कळविले की राज्य माहिती आयुक्त राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांच्या कडील अपील क्रमांक 915/2010 आदेश पारीत दि. 31.7.2010 नुसार माहितीचा अधिकार अधिनियम 2005 महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्येशीय विकास बॅंकेला लागू होत नसल्याने अपील खारीज केलेले आहे असे त्यांना कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील दि. 19.5.2011 रोजी जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवून त्यांचे अपील फेटाळले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक श्री भालेराव हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री चव्हाण हे हजर होते.

4. जन माहिती अधिकारी श्री भालेराव यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 15.4.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 19.4.2011 रोजी प्राप्त झाला होता. या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 19.4.2011 च्या पत्राने असे कळविण्यात

आले की राज्य माहिती आयुक्त राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांच्या कडील अपील क्रमांक 915/2010 आदेश पारीत दि. 31.7.2010 नुसार माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी या बॅंकेला लागू नसल्याने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविल्याचे त्यांनी सांगितले.

4. तसेच जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की यापूर्वी राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांनी त्यांच्याकडे दाखल झालेल्या अपील क्रमांक 915/2010 मध्ये दि. 31.7.2010 रोजी निर्णय निर्गमीत केलेला असून त्या निर्णया मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्येशीय विकास बॅंकेला लागू होत नाही या कारणास्तव अपील खारीज केलेले आहे असे नमुद करुन आयोगाच्या दि. 31.7.2010 च्या निर्णयाची प्रत आयोगा समोर दाखल केली. तसेच या निर्णयामध्ये आयोगाने असे देखील नमुद केलेले आहे की मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचे कडील याचिका क्रमांक 5666/2007 मध्ये सहकारी बॅंका माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (ज) नुसार सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत येत नसल्याने सदरचा कायदा सहकारी बॅंकांना लागू होत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती यांनी देखील दि. 10.3.2010 रोजी श्री सांभारे विरुध्द यवतमाळ जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्येशीय विकास बॅंके मर्या. यवतमाळ यांचे प्रकरणी ही बॅंक सार्वजनिक प्राधिकरण नसल्याने अपील क्रमांक 1914/2009 खारीज केलेले आहे. त्या निर्णयाची प्रत देखील त्यांनी आयोगा समोर दाखल केली.

5. अपीलकर्ता व उत्तरवादी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की वर नमूद केलेल्या निर्णया नुसार माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी सदरच्या बॅंकेला लागू होत नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे. करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2335-2337

जा.क्र.————————— दि.................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 991 नाग/2011, अपील क्रमांक 992 नाग/2011, अपील क्रमांक 993 नाग/2011 व अपील क्रमांक 994 नाग/2011.**

**<u>अपील क्रमांक 991 नाग/2011</u>**

श्रीमती एस. आर. मट्टा, ॲडव्होकेट
410, मेकोसाबाग रेल्वे क्रॉसींग जवळ नागपूर
ता. जि. नागपूर – 4 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक(प्रशासन)
आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड,
मुंबई 400 001
2) जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,
आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड,
मुंबई 400 001 ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 992 नाग/2011</u>**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई
मंत्रालय, मुंबई–32
2) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई
मंत्रालय मुंबई–32 ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 993 नाग/2011</u>**

1) डॉ. जी. एम. राठोड
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक
आरोग्य सेवा नागपूर
माताकचेरी, दिक्षाभूमी जवळ, नागपूर – 4
2) श्री एन. एम. ठाकरे मुख्य प्रशासकीय अधिकारी
जन माहिती अधिकारी
उपसंचालक आरोग्य सेवा नागपूर
माताकचेरी, दिक्षाभूमी जवळ, नागपूर – 4 ..... **उत्तरवादी**

2

**<u>अपील क्रमांक 994 नाग/2011</u>**
1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक
आरोग्य सेवा संचालनालय, पुणे
जुनी इमारत, ससून हॉस्पीटल जवळ, पुणे–1
2) श्रीमती भावना चौधरी
जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी
सहसंचालक आरोग्य सेवा संचालनालय, पुणे
जुनी इमारत, ससून हॉस्पीटल जवळ, पुणे–1 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.10.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.6.2011 रोजी अपील क्रमांक 991 नाग/2011. अपील क्रमांक 992 नाग/2011. अपील क्रमांक 993 नाग/2011 व अपील क्रमांक 994 नाग/2011 राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये चार स्वतंत्र द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. वर नमुद केलेल्या चारही अपीलां मध्ये मागितलेली माहिती ही एकच असल्यामुळे आणि अपीलकर्ता हे देखील एकच असल्यामुळे चारही अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यासाठी आयोगाचे कार्यालयातून दि. 9.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 10.10.2011 रोजी चारही द्वितीय अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. प्रस्तूत चारही अपीलांमध्ये मागितलेली माहिती ही एकच असल्यामुळे आणि अपीलकर्ता हे देखील एकच असल्यामुळे चारही अपीलांची एकत्रित सुनावणी घेवून चारही अपीलांचा एकत्रित निर्णय देण्यात आला.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की त्यांनी दि. 14.3.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी सहसंचालक आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचेकडे तसेच अवर सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई मंत्रालय मुंबई यांचेकडे त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी उपसंचालक आरोग्य सेवा नागपूर यांचेकडे आणि जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी सहसंचालक आरोग्य सेवा संचालनालय, पुणे यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली वेगवेगळे चार अर्ज सादर करुन खालीलप्रमाणे माहिती मागितलेली होती.

1) मुळ अर्ज क्र. 742/1991 मध्ये दि. 12.1.2011 रोजी दाखल करण्यात आलेल्या शपथपत्रात पृष्ठ क्र. 2 परिच्छेद क्र. 3 मध्ये नमुद केल्याप्रमाणे डॉ. वासुदेव यांना नियीमत वैद्यकीय अधिका–याचे लाभ केंव्हा देण्यात आले आणि कोणत्या आस्थापने वरुन देण्यात आले.
2) शासन निर्णय दि. 18.4.1985 केव्हा अंमलात आणण्यात आला. याबाबत माहिती
3) डॉ. वासुदेव यांचे पेक्षा कनिष्ठतम वैद्यकीय अधिकारी यांना मानीव दिनांक देण्यात आलेला आहे त्यांचे नाव आणि
4) डॉ. वासुदेव यांच्या मानीव दिनांका संदर्भात शासना कडे प्रलंबीत असलेल्या प्रकरणाची सद्यस्थिती अशी माहिती त्यांनी वर नमुद केलेल्या जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेली होती. तथापि त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई तर्फे श्रीमती भावना चौधरी हया हजर होत्या. तसेच उपसंचालक आरोग्य सेवा नागपूर येथील जन माहिती अधिकारी श्री एन. एम. ठाकरे मुख्य प्रशासकीय अधिकारी हे हजर होते. आणि मुख्य प्रशासकीय अधिकारी सहसंचालक आरोग्य सेवा संचालनालय, पुणे श्रीमती भावना चौधरी हया हजर होत्या.

5. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी त्यांच्या कडील दि. 5.4.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले की त्यांचा दि. 14. 3.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 28.3.2011 रोजी प्राप्त झाला होता. तथापी या संदर्भातील माहिती ही माहिती अधिकारी संचालक आरोग्य सेवा मुंबई यांचेकडे उपलब्ध असल्यामुळे आपणास अपेक्षित असलेली माहिती आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्याकडे प्राप्त होवू शकेल म्हणून आपला अर्ज पुढील कार्यवाहीसाठी माहिती अधिकारी संचालक आरोग्य सेवा मुंबई यांचेकडे पाठविण्यात येत आहे असे त्यांना अवर सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी कळविलेले आहे.

6. आजच्या सुनावणीस आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्या तर्फे आरोग्य सेवा संचालनालय, पुणे कार्यालयातील मुख्य प्रशासकीय अधिकारी श्रीमती भावना चौधरी यांनी आयोगापुढे सांगीतले की अपीलकर्तीने वर नमुद केलेला दि. 14.3.2011 चा माहितीचा अर्ज वर नमुद केलेल्या चार जन माहिती अधिकारी यांचेकडे स्वतंत्रपणे पाठविलेला आहे. तथापी सदरच्या माहितीच्या अर्जातील माहिती ही सारखीच आहे असे त्यांनी नमुद करुन आयोगापुढे सांगीतले की अपीलकर्तीने सदरच्या माहितीच्या अर्जात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे मुळ अर्ज क्र. 742/1991 च्या संदर्भात माहिती मागितलेली आहे. तथापी अपीलकर्तीने मागितलेली माहिती ही मागील 20 वर्षा पूर्वीची असल्याने माहिती काढण्यास विलंब लागण्याची शक्यता आहे म्हणून सदर माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्यामध्ये मिळाली तर आपणास कळविण्यात

येईल असे अपीलकर्तीस दि. 2.4.2011 च्या पत्राने सुरुवातीस कळविण्यात आले. मात्र सदरच्या माहितीचा शोध घेवूनही माहिती 20 वर्षा पूर्वीची असल्यामुळे उपलब्ध करुन देता आली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यानंतर अपीलकर्तीने प्रथम अपील सहसंचालक आरोग्य सेवा पुणे यांचेकडे दाखल केले. आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 2.6.2011 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय अपीलकर्तीस कळवून प्रथम अपील खारीज केले असे श्रीमती भावना चौधरी यांनी आयोगापुढे सांगीतले. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी श्री एन. एम. ठाकरे यांनी आयोगापुढे सांगीतले की अपीलकर्तीचा दि. 14.3.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 16.3.2011 रोजी प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्तीस दि. 19.4.2011 च्या पत्राने असे कळविण्यात आले की डॉ. वासुदेव यांच्या बाबत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण नागपूर येथे मुळ अर्ज क्र. 742/1991 मध्ये दाखल करण्यात आलेले शपथपत्र सहसंचालक आरोग्य सेवा पुणे यांनी दिलल्या माहितीच्या आधारे सादर केलेले आहे असे त्यांनी अपीलकर्तीस कळविले. त्यानंतर अपीलकर्तीने प्रथम अपील सहसंचालक आरोग्य सेवा नागपूर मंडळ यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 21.5.2011 च्या पत्राने सहसंचालक आरोग्य सेवा पुणे यांचेकडे पत्र पाठवून डॉ. वासुदेव यांच्या मानीव दिनांका संदर्भात शासना कडे प्रलंबीत असलेल्या प्रकरणी शासन आदेश निर्गमीत करण्याबाबत शासनास विनंती करण्यात यावी असे कळविले आणि त्याची प्रत अपीलकर्तीस उपलब्ध करुन दिली असे श्री ठाकरे यांनी आयोगापुढे सांगीतले.

7. अपीलकर्ती तसेच वर नमुद केलेले जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की डॉ. वासुदेव यांच्या बाबत मुळ अर्ज क्र. 742/1991 मध्ये दि. 12.1.2011 रोजी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणा मध्ये जे शपथपत्र दाखल केलेले आहे ते कोणत्या कागदपत्राचे आधारे दाखल केलेले आहे त्याची माहिती त्यांना मिळाली नाही. सदरचे दि. 12.1.2011 चे शपथपत्र महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात दाखल झाल्याचे श्रीमती भावना चौधरी मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी आयोगापुढे मान्य केले. म्हणून दि. 12.1.2011 रोजी दाखल केलेले शपथपत्र कोणत्या कागदपत्राचे आधारे दाखल झालेले आहे याची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ती यांचे अपील क्रमांक 991 नाग/2011 आणि अपील क्रमांक 994 नाग/2011 अंशतः मंजुर करण्यात येत आहे. तथापी अपील क्रमांक 992 नाग/2011 आणि अपील क्रमांक 993 नाग/2011 मध्ये संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

5

## आ दे श

1) अपीलकर्ती यांचे अपील क्रमांक 991 नाग/2011 आणि अपील क्रमांक 994 नाग/2011 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी सहसंचालक आरोग्य सेवा संचालनालय, पुणे यांनी अपीलकर्तीस डॉ. वासुदेव यांच्या बाबत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचेकडे दि. 12.1.2011 रोजी दाखल केलेले शपथपत्र कोणत्या कागदपत्राचे आधारे दाखल केलेले आहे याची माहिती अपीलकर्तीस विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ती यांचे अपील क्रमांक 992 नाग/2011 आणि अपील क्रमांक 993 नाग/2011 खारीज करण्यात येते.
3) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2328-2332

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 990 नाग/2011**

श्री गोविंद झोंगाजी तेलंग
मु. पो. वायगाव(निपाणी)
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद वर्धा
ता. जि. वर्धा
2) श्री यु. ए. मानुसमारे
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक(पंचायत विभाग)
जिल्हा परिषद वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.10.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 10.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 5.3.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक(पंचायत विभाग) जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री जोगे सचिव ग्रा.पं.वायगाव यांनी दिलेले अर्ज गायब करुन रेकॉर्ड मध्ये हेराफेरी केल्याबाबत लोकशाही दिनामध्ये तक्रार अर्ज टोकन क्र. 265, 517, 782 व 82 या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 6.4.2011 च्या पत्राने असे कळविले की सचिव श्री जोगे यांनी दिलेला अर्ज गायब करुन रेकॉर्ड मध्ये हेराफेरी केल्याबाबत तक्रारी मध्ये नमुद केलेले आहे. टोकन क्र. 265, 517, 782 व 82 सदर प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी जिल्हा परिषद वर्धा येथे पाठविण्यात आलेले आहे करीता चौकशी अहवाल विहित मुदतीत प्राप्त होताच आपणास पाठविण्यात येईल असे त्यांना कळविले. मात्र केलेल्या चौकशी संदर्भात कोणतीही माहिती अद्यापपर्यंत त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक(पंचायत विभाग) जिल्हा परिषद वर्धा श्री मानुसमारे हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा यांच्या वतीने श्री राठोड विस्तार अधिकारी हे हजर होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 5.3.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 8.3.2011 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्त्यास दि. 6.4.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 16.6.2011 आणि दि. 27.6.2011 रोजी ठेवण्यात

आली. तथापी अपीलकर्ता गैरहजर राहिले म्हणून प्रथम अपील खारीज करण्यात आले आणि सदरच्या निर्णयाची प्रत अपीलकर्त्यास दि. 27.6.2011 च्या पत्राने पोस्टाद्वारे पाठविल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की प्रस्तूत प्रकरणात त्यानंतर चौकशी अहवाल मुख्य कार्यपालन अधिकारी(ग्रापंचायत) जिल्हा परिषद यांनी तयार केलेला होता. त्याची प्रत अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत केली. मात्र अपीलकर्ता यांचे याबाबत म्हणणे असे आहे की सदरच्या चौकशी अहवालात त्यांचे तक्रार अर्जातील सर्व मुद्दे समाविष्ट नाही. तथापी याबाबत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचे सर्व मुद्दे चौकशी अहवालात समाविष्ट आहे. म्हणून चौकशी अहवालाच्या गुणवत्तेबाबत अपीलकर्त्याने योग्य त्या अधिका–याकडे दाद मागणे योग्य होईल. तथापी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2334-2335

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1124 नाग/2011

मे. हल्दीराम फूडस् इंटरनॅशनल लि. ॲन्ड ग्रुप कंपनीस(त्रयस्थपक्ष)
880, स्माल फॅक्टरी एरिया, भंडारा रोड नागपूर
ता. जि. नागपूर – 440008 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त(व्हॅट–प्रशा.)
नागपूर विभाग नागपूर विक्रीकर भवन, नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री लंके पिल्लेवार
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त
विक्रीकर कार्यालय (व्हॅट–प्रशा.) नागपूर विभाग
विक्रीकर भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर ..... **उत्तरवादी**
3) श्री मनोहर बापूराव खोरगडे(मूळ अर्जदार)
एम–5, प्रिमीअम प्लाझा, 242 खरे टाऊन
धरमपेठ नागपूर –10

**( आदेश पारित दिनांक 2.12.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.7.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 25.10.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.12.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस त्रयस्थ पक्ष म्हणून अपीलकर्ता यांच्या वतीने श्री पवन अग्रवाल हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे सांगितले की त्यांनी प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त(व्हॅट–प्रशा.) नागपूर विभाग नागपूर यांच्या कडील दि. 7.7.2011 च्या प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द सदरचे द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारा खालील अर्जदार मनोहर बापूराव खोरगडे यांना त्यांची माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले आहेत. तथापी त्रयस्थपक्ष म्हणून त्यांची माहिती अर्जदार मनोहर बापूराव खोरगडे यांना देण्यात येवू नये यासाठी त्यांनी त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

3. श्री पवन अग्रवाल यांनी आजच्या सुनावणीस आयोगापुढे सांगितले की मुळ अर्जदार श्री खोरगडे यांनी दि. 3.3.2011 रोजी माहिती अधिकारा खालील अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे मे. हल्दीराम फूडस् इंटरनॅशनल लि. नागपूरच्या संदर्भातील 1 ते 12 युनीटची माहिती मागितलेली होती. आणि सदरच्या माहिती मध्ये व्यवसायाचे नाव, मालकांची नावे, नोंदणी क्रमांक, या युनीटला सामुहीक प्रोत्साहन योजनेत मंजूर केलेली रक्कम आणि या युनीटसना प्रोत्साहन योजनेखाली उपलब्ध करुन दिलेली सवलत इत्यादी बाबत माहिती मागितलेली होती. मात्र खालील कारणास्तव मुळ अर्जदाराने मागितलेली माहिती देण्यात येवू नये असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

1) मागितलेली माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची आहे व त्यात कोणतेही जनहित नाही.

2) मागितलेली माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची असून त्यांच्या व्यवसायाशी संबंधीत आहे व ती उघड केल्याने त्यांच्या व्यावसायीक हितास बाधा येवू शकते.

3) आपली जी माहिती विक्रीकर विभागाकडे आहे व अर्जदारानी मागीतलेली आहे ती माहिती विश्वस्त म्हणून त्यांनी विक्रीकर विभागास दिली आहे त्यामुळे ती माहिती अधिकार अधिनियमच्या कलम 8 (1) (इ) व (ज) खाली येते म्हणून अशी माहिती उघड करण्या पासून सुट दिली आहे. तसेच अशी माहिती मुल्यावर्धीत कर कायद्याच्या कलम 71 (1) खाली उघड करण्यास मनाई केलेली आहे त्यामुळे देवू नये.

4) तसेच काही व्यक्ती माहिती अधिकार अधिनियमचा गैरवापर करीत आहे व अपीलकर्त्यास व त्यांच्या घटकास त्रास देत आहे ते फक्त वैयक्तीक स्वरुपाची माहिती मागत आहेत व सदर माहिती ते गैरवापर करण्याच्या उद्येशाने मागत आहेत आणि सदरच्या माहितीचा वापर ते त्रास देण्यासाठी करतात म्हणून त्यांच्या युनीटची वर नमूद केलेली माहिती अर्जदारास देण्यात येवू नये असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच त्यांनी आयोगापुढे दाखल केलेल्या लेखी निवेदनात रिलायन्स इंडस्ट्री विरुध्द गुजरात राज्य माहिती आयुक्त यांच्या दिलेल्या निर्णया बाबत मा. उच्च न्यायालयाने त्रयस्थपक्षाशी संबंधीत व वैयक्तीक स्वरुपाची माहिती आणि ज्या माहिती मध्ये व्यापक जनहित नाही अशी माहिती अर्जदारास देण्यात येवू नये असा निर्णय मा. उच्च न्यायालय यांनी निर्गमीत केलेला आहे असे त्यांनी लेखी निवेदनात नमूद केलेले आहे.

4. आजच्या सुनावणीस माहिती मागणारे मूळ अर्जदार श्री मनोहर बापूराव खोरगडे हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे सांगितले की दि. 3.3.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त यांच्या कार्यालयाकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मे. हल्दीराम फूडस् इंटरनॅशनल लि. नागपूरच्या संदर्भातील एकूण 12 युनीटची माहिती मागितलेली होती. मे. हल्दीराम फूडस् इंटरनॅशनल लि. हे शासनाच्या विक्रीकर विभागा कडून प्रोत्साहन योजनेखाली लाभ घेत असतात. म्हणून त्यांनी मागितलेली माहिती ही व्यापक जनहिताशी संबंधीत असल्याने त्यांना ती उपलब्ध करुन द्यावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

5. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त श्री लंके पिल्लेवार हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त यांच्या वतीने त्यांनाच प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

6. जन माहिती अधिकारी श्री लंके पिल्लेवार यांनी आयोगापुढे सांगितले की मूळ अर्जदार श्री मनोहर बापूराव खोरगडे यांचा दि. 3.3.2011 माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 4.3.2011 रोजी प्राप्त झाला होता. मूळ अर्जदाराने मागितलेली माहिती ही त्रयस्थपक्षाशी संबंधीत असल्याने त्यांनी दि. 7.3.2011 च्या पत्राने त्रयस्थपक्ष म्हणून मे. हल्दीराम फूडस् इंटरनॅशनल लि. नागपूर यांना नोटिस देवून मूळ अर्जदाराच्या माहिती पुरविण्याच्या संदर्भात त्यांचे अभिप्राय मागविले. त्रयस्थपक्ष म्हणून मे. हल्दीराम फूडस् इंटरनॅशनल लि. नागपूर यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 14.3.2011 च्या पत्राने आक्षेप नोंदविले आणि सदरच्या आक्षेपात मुळ अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देवू नये असे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना कळविले. जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थपक्षाचे म्हणणे एकून घेवून त्रयस्थपक्षाच्या आक्षेपा वरील आक्षेप नाकारुन मुळ अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्याचा निर्णय दि. 15.4.2011 रोजी घेतला आणि त्याची प्रत त्यांनी अपीलकर्त्यास व मुळ अर्जदारास पाठविली. जन माहिती अधिकारी यांच्या दि. 15.4.2011 च्या माहिती देण्याच्या निर्णयावर अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त(व्हॅट–प्रशा.) नागपूर विभाग नागपूर यांचेकडे दि. 11.5.2011 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 31.5.2011, दि. 9.6.2011 आणि दि. 15.6.2011 ला अंतीम सुनावणी घेवून अपीलकर्ता यांच्या वकीलांचे म्हणणे एकून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 7.7.2011 रोजी प्रथम अपीलाचा सविस्तर निर्णय दिला. आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात त्यांनी असे नमुद केले की मूळ अर्जदार श्री मनोहर बापूराव खोरगडे यांनी दि. 3.3.2011 च्या माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याचे सविस्तर विवेचन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 7.7. 2011 च्या प्रथम अपीलाच्या निर्णयात नमूद करुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 10 दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. आणि प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 13.7.201 च्या पत्राने आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. सदरची माहिती मुळ अर्जदार श्री खोरगडे यांना प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत आयोगापुढे मान्य केले मात्र अद्याप त्यांना फक्त असेसमेंटची माहिती मिळाली नाही असे नमुद केले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की असेसमेंटची कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही. म्हणून असेसमेंटची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे योग्य होईल.

7. अपीलकर्ता यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री पवन अग्रवाल तसेच जन माहिती अधिकारी आणि मुळ अर्जदार यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे

दिसून येते की मूळ अर्जदार श्री मनोहर बापूराव खोरगडे यांनी अपीलकर्त्याच्या संदर्भात 1मागितलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी नुसार कोणत्याही प्रकारची गोपनिय स्वरुपाची दिसून येत नाही. मूळ अर्जदार यांनी मागितलेली माहिती शासनाच्या विक्रीकर विभागाकडे उपलब्ध आहे आणि सदरची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त यांच्या दि. 7.7.2011 च्या प्रथम अपीलाच्या निर्णयात सविस्तर विश्लेषण दिलेले आहे. म्हणून प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांचा दि. 7.7.2011 चा निर्गमीत केलेला प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे कायम करण्यात येत आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे. तथापी जन माहिती अधिकारी यांनी मूळ अर्जदार श्री मनोहर बापूराव खोरगडे यांना मे. हल्दीराम फूडस् इंटरनॅशनल लि. नागपूर यांना एकूण दिलेल्या प्रोत्साहनात्मक रकमे बाबत असेसमेंट अद्याप पूर्ण झालेले नाही अशी वस्तुस्थिती देखील उपलब्ध करुन देणे योग्य होईल. म्हणून खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आ दे श

1) प्रथम अपीलीय अधिकारी यांचा दि. 7.7.2011 चा प्रथम अपीलाचा निर्णय कायम करण्यात येत आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.
2) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त यांनी मूळ अर्जदार श्री मनोहर बापूराव खोरगडे यांना मे. हल्दीराम फूडस् इंटरनॅशनल लि. नागपूर यांना एकूण दिलेल्या प्रोत्साहनात्मक रकमेचे असेसमेंट अद्याप पूर्ण झालेले नाही अशी वस्तुस्थिती मूळ अर्जदारास स्पष्टपणे कळवावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2337-2340

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1125 नाग/2011

मे. हल्दीराम फूडस् इंटरनॅशनल लि. ॲन्ड ग्रुप कंपनीस(त्रयस्थपक्ष)
880, स्माल फॅक्टरी एरिया, भंडारा रोड नागपूर
ता. जि. नागपूर – 440008 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त(व्हॅट–प्रशा.)
नागपूर विभाग नागपूर विक्रीकर भवन, नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री लंके पिल्लेवार
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त
विक्रीकर कार्यालय (व्हॅट–प्रशा.) नागपूर विभाग
विक्रीकर भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर ..... **उत्तरवादी**
3) श्री सुदर्शन चक्रधर(मूळ अर्जदार)
देशोन्नती/राष्ट्राप्रकाश, सराफा कोर्ट, यशवंत स्टेडियम समोर,
धंतोली नागपूर –12

**( आदेश पारित दिनांक 2.12.2011 )**

### नि र्ण य

अपीलकर्ता यांनी त्रयस्थ पक्ष म्हणून दिनांक 18.7.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 25.10.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.12.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. माहिती अधिकारी हजर आहेत. मात्र माहिती अधिकारा खाली माहिती मागणारे मूळ अर्जदार गैरहजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने श्री पवन अग्रवाल हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे सांगितले की त्यांनी प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त(व्हॅट–प्रशा.) नागपूर विभाग नागपूर यांच्या कडील दि. 14.7.2011 च्या प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द सदरचे द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारा खालील अर्जदार श्री सुदर्शन चक्रधर यांना त्यांची माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले आहेत. तथापी त्रयस्थपक्ष म्हणून त्यांची माहिती अर्जदार श्री सुदर्शन चक्रधर यांना देण्यात येवू नये यासाठी त्यांनी त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

3. श्री पवन अग्रवाल यांनी आजच्या सुनावणीस आयोगापुढे सांगितले की अर्जदार यांनी दि. 29.9.2010 रोजी माहिती अधिकारा खालील अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे मे. हल्दीराम फूडस् इंटरनॅशनल लि. नागपूरच्या संदर्भातील 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. आणि सदरच्या माहिती मध्ये किती फर्म आहेत, व्हॅट नंबर काय, सी एस टी, बी एस टी नंबर रिफंड आणि व्हॅट याबाबत माहिती मागितलेली होती. तथापी वरील माहिती अर्जदारास दिल्यास माहिती अधिकाराचे कलम 8 (1) (इ) व (जे) आणि मुल्यावर्धीत कर कायद्याच्या कलम 71 चे उल्लंघन होत असल्याने माहिती देणे योग्य नाही तसेच त्यांनी आयोगापुढे लेखी निवेदन सादर करुन असेही नमूद केले की खालील कारणास्तव अर्जदाराने मागितलेली माहिती देण्यात येवू नये असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

1) मागितलेली माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची आहे व त्यात कोणतेही जनहित नाही.

2) मागितलेली माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची असून त्यांच्या व्यवसायाशी संबंधीत आहे व ती उघड केल्याने त्यांच्या व्यावसायीक हितास बाधा येवू शकते.

3) आपली जी माहिती विक्रीकर विभागाकडे आहे व अर्जदारानी मागीतलेली आहे ती माहिती विश्वस्त म्हणून त्यांनी विक्रीकर विभागास दिली आहे त्यामुळे ती माहिती अधिकार अधिनियमच्या कलम 8 (1) (इ) व (ज) खाली येते म्हणून अशी माहिती उघड करण्या पासून सुट दिली आहे. तसेच अशी माहिती मुल्यावर्धीत कर कायद्याच्या कलम 71 (1) खाली उघड करण्यास मनाई केलेली आहे त्यामुळे देवू नये.

4) तसेच काही व्यक्ती माहिती अधिकार अधिनियमचा गैरवापर करीत आहे व अपीलकर्त्यास व त्यांच्या घटकास त्रास देत आहे ते फक्त वैयक्तीक स्वरुपाची माहिती मागत आहेत व सदर माहिती ते गैरवापर करण्याच्या उद्येशाने मागत आहेत आणि सदरच्या माहितीचा वापर ते त्रास देण्यासाठी करतात म्हणून त्यांच्या युनीटची वर नमूद केलेली माहिती अर्जदारास देण्यात येवू नये असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच त्यांनी आयोगापुढे दाखल केलेल्या लेखी निवेदनात रिलायन्स इंडस्ट्री विरुध्द गुजरात राज्य माहिती आयुक्त यांच्या दिलेल्या निर्णया बाबत मा. उच्च न्यायालयाने त्रयस्थपक्षाशी संबंधीत व वैयक्तीक स्वरुपाची माहिती आणि ज्या माहिती मध्ये व्यापक जनहित नाही अशी माहिती अर्जदारास देण्यात येवू नये असा निर्णय मा. उच्च न्यायालय यांनी निर्गमीत केलेला आहे असे त्यांनी लेखी निवेदनात नमूद केलेले आहे.

4. आजच्या सुनावणीस माहिती मागणारे मूळ अर्जदार श्री सुदर्शन चक्रधर हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही किंवा त्यांनी आयोगापुढे कोणतेही लेखी निवेदन सादर केलेले नाही.

5. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त श्री लंके पिल्लेवार हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त यांच्या वतीने त्यांनाच प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

6. जन माहिती अधिकारी श्री लंके पिल्लेवार यांनी आयोगापुढे सांगितले की मूळ अर्जदार श्री सुदर्शन चक्रधर यांचा दि. 29.9.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. मूळ अर्जदाराने मागितलेली माहिती ही त्रयस्थपक्षाशी संबंधीत असल्याने त्यांनी दि. 7.3.2011 च्या पत्राने त्रयस्थपक्ष म्हणून मे. हल्दीराम फूडस् इंटरनॅशनल लि. नागपूर यांना नोटिस देवून मूळ अर्जदाराच्या माहिती पुरविण्याच्या संदर्भात त्यांचे अभिप्राय मागविले. त्रयस्थपक्ष म्हणून मे. हल्दीराम फूडस् इंटरनॅशनल लि. नागपूर यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 25.10.2010 च्या पत्राने आक्षेप नोंदविले आणि सदरच्या आक्षेपात मुळ अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देवू नये असे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना कळविले. जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थपक्षाचे म्हणणे एकून घेवून त्रयस्थपक्षाच्या आक्षेपा वरील आक्षेप नाकारुन मुळ अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्याचा निर्णय दि. 30.10.2010 रोजी घेतला आणि त्याची प्रत त्यांनी अपीलकर्त्यास पाठविली. जन माहिती अधिकारी यांच्या दि. 30.10.2010 च्या माहिती देण्याच्या निर्णयावर अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त(व्हॅट–प्रशा.) नागपूर विभाग नागपूर यांचेकडे दि. 25.11.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 20.12.2010, दि. 28.12.2010 आणि दि. 16.4.2011 ला अंतीम सुनावणी घेवून अपीलकर्ता यांच्या वकीलांचे म्हणणे एकून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 14.7.2011 रोजी प्रथम अपीलाचा सविस्तर निर्णय दिला. आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात त्यांनी असे नमुद केले की मूळ अर्जदार श्री सुदर्शन चक्रधर यांनी दि. 29.9.2010 च्या माहितीच्या अर्जाने मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. आणि त्याबाबत सविस्तर विवेचन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 14.7.2011 च्या प्रथम अपीलाच्या निर्णयात नमूद करुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 10 दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. तथापी प्रथम अपीलाच्या हया निर्णया विरुध्द अपीलकर्ता यांनी दि. 18.7.2011 ला राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना कळवून द्वितीय अपीलाचा निर्णय लागेपर्यंत माहिती देण्यात येवू नये असे जन माहिती अधिकारी यांना कळविले. तसेच मुळ अर्जदार हे देखील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आले नाहीत. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले.

7. अपीलकर्ता यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री पवन अग्रवाल तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की मूळ अर्जदार श्री सुदर्शन चक्रधर यांनी अपीलकर्त्याच्या संदर्भात मागितलेली माहिती ही माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी नुसार कोणत्याही प्रकारची गोपनिय स्वरुपाची दिसून येत नाही. मूळ अर्जदार यांनी मागितलेली माहिती शासनाच्या विक्रीकर विभागाकडे उपलब्ध आहे आणि सदरची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम

2005 अंतर्गत उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त यांच्या दि. 14.7.2011 च्या प्रथम अपीलाच्या निर्णयात सविस्तर विश्लेषण दिलेले आहे. म्हणून प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांचा दि. 14.7. 2011 चा निर्गमीत केलेला प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे कायम करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) प्रथम अपीलीय अधिकारी यांचा दि. 14.7.2011 चा प्रथम अपीलाचा निर्णय कायम ठेवण्यात येत असून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.
2) जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णया प्रमाणे मूळ अर्जदार श्री सुदर्शन चक्रधर यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2342-2345

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1538 नाग/2011**

श्री मनोहर बापूराव खोरगडे
एम–5, प्रिमीअम प्लाझा, 242 खरे टाऊन
धरमपेठ नागपूर –440010 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त(व्हॅट प्रशासन)
नागपूर विभाग नागपूर
2) श्री लंके पिल्लेवार
जन माहिती अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त(व्हॅट प्रशासन)
नागपूर विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.12.2011 )**

**नि र्ण य**

प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्ता यांच्या दि. 3.3.2011 च्या माहितीच्या अर्जातील माहिती बाबत अपील क्र. 1124/2011 दाखल झाले होते. त्याची सुनावणी दिनांक 2.12.2011 रोजी होवून निर्णय निर्गमीत केलेला आहे म्हणून पुन्हा त्याच माहितीच्या अर्जा बाबत स्वतंत्र निर्णय देण्याची आवश्यकता नाही.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2347

जा.क्र.––––––––– दि.................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1006 नाग/2011 व अपील क्रमांक 1007 नाग/2011**

श्री धर्मेन्द्र वासुदेव मंडलीक
लाडपूरा नांदगांव रोड नागपूर
ता. जि. नागपूर –17 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सपाटे नझूल नायब तहसिलदार
प्रथम अपीलीय अधिकारी
नझूल विभाग जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री एस. एस. हरदास नझूल नायब तहसिलदार
जन माहिती अधिकारी
नझूल विभाग जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.10.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.6.2011 रोजी अपील क्रमांक 1006 नाग/2011 व अपील क्रमांक 1007 नाग/2011 राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन स्वतंत्र द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 11.10.2011 रोजी दोन्ही द्वितीय अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी आयोगाच्या कार्यालयाकडे वर नमूद केलेल्या दोन्ही द्वितीय अपीलांमधील माहितीच्या अर्जाचे स्वरुप एकच असल्यामुळे दोन्ही अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यात आली. आणि एकत्रित निर्णय निर्गमीत करण्यात आला.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

4. तथापी आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी नझूल विभाग तहसिल कार्यालय नागपूर श्री एस. एस. हरदास नझूल नायब तहसिलदार हे हजर होते तसेच प्रथम अपीलीय अधिकारीयांच्या वतीने श्री सपाटे नझूल नायब तहसिलदार जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर हे हजर होते.

5. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की अपीलकर्त्याचे दि. 17.1.2011 चे दोन माहितीचे अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होते. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती नझूल तहसिलदार नागपूर यांचेशी संबंधीत असल्याने त्यांना दि. 19.1.2011 च्या पत्राने अपीलकर्ता यांना पत्र पाठवून असे कळविले की आपण मागितलेल्या माहितीच्या संदर्भात नझूल तहसिलदार नागपूर यांच्या कडून या प्रकरणात अहवाल सादर करण्याबाबत कळविलेले आहे तरी सदर प्रकरणात अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल आणि त्या पत्राची प्रत नझूल तहसिलदार नागपूर यांना देवून वरील प्रकरणात अहवाल दाखल करण्यास कळविले होते. त्याला अनुसरुन जन

माहिती अधिकारी तथा नझूल तहसिलदार तहसिल कार्यालय नागपूर यांनी दि. 15.2.2011 च्या पत्रा प्रमाणे त्याचा अहवाल उपजिल्हाधिकारी महसूल नागपूर यांचेकडे पाठवून त्या अहवालाची प्रत अपीलकर्त्यास देखील दि. 15.2.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिल्याचे सांगीतले. आणि त्याबाबतची अपीलकर्त्याची पोच आयोगापुढे दाखविली.

6. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपजिल्हाधिकारी महसूल यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की नझूल तहसिलदार तहसिल कार्यालय नागपूर यांच्या कडून प्राप्त झालेल्या अहवालाची प्रत व त्या सोबत प्राप्त झालेल्या कागदपत्राच्या प्रती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्या आणि त्यासाठी अपीलकर्ता यांनी आदेश प्राप्त झाल्या पासून 10 दिवसाचे आत स्वतः कार्यालयात संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र अपीलकर्ता 10 दिवसाचे आत किंवा आजपर्यंत देखील त्यांच्या कार्यालयात ही कागदपत्रे प्राप्त करण्यासाठी उपस्थित झाले नाही असेही जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

7. वर नमुद केल्याप्रमाणे दोन्ही जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेवून प्रथम अपीलाच्या निर्णया प्रमाणे अपीलकर्त्यास द्यावयाची कागदपत्रे विनामुल्य पोस्टाद्वारे किंवा व्यक्तीशः उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी नझूल विभाग जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांनी अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या निर्णयातील नमुद केलेली कागदपत्रे विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2349-2350

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1010 नाग/2011**

श्री अनिल श्रीराम माणकीकर
C/o. श्री संत गजानन महाराज मंदीर,
मोठया पोस्ट ऑफीसचे पाठीमागे,
लहानूजी नगर वर्धा
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एल. एम. बोरीकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता (स व सु प्रविभाग)
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. वर्धा
विद्युत भवन, हिंगणघाट रोड, बोरगाव नाका, वर्धा

2) श्री एस. एस. तायडे कार्यकारी अभियंता
जन माहिती अधिकारी
स व सु प्रविभाग महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. वर्धा
विद्युत भवन, हिंगणघाट रोड, बोरगाव नाका, वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.10.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 12.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 15.4.2011 रोजी जन माहिती अधिकारी महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. स व सु प्रविभाग वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन जुन 2002 ते फेब्रु. 2006 च्या पगाराचे व इतर देयका बाबत झालेल्या पत्रव्यवहारा संदर्भात 1 ते 11 मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील अधिक्षक अभियंता वर्धा यांचेकडे दाखल केले. त्यानंतर त्यांना दि. 27.7.2011 च्या पत्राने

पाठविलेली माहिती त्यांना दि. 28.7.2011 रोजी प्राप्त झाली मात्र सदरची माहिती विलंबाने प्राप्त झाली असून त्यांना मुद्या क्र. 2, 8 आणि 11 ची अपूर्ण माहिती त्यांना मिळाल्याचे त्यांनी नमुद केले आणि जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसात त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 प्रमाणे शास्तीची कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री तायडे हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता श्री बोरीकर हे हजर होते.

4. जन माहिती अधिकारी श्री तायडे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 15.4.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयातील Assistant Manager(Personal) वर्धा यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांना दि. 28.4. 2011 रोजी पत्र लिहून त्यांच्या कडून माहिती मागविली तथापी त्यांच्या कडून 30 दिवसात माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी त्याबाबत अधिक्षक अभियंता यांचेकडे टिपणी लिहून कळविले. अधिक्षक अभियंता यांनी देखील Assistant Manager(Personal) यांना त्वरीत माहिती उपलब्ध करुन देण्या बाबत कळविले. मात्र त्यांच्या कडून 30 दिवसात कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत माहिती देता आली नाही असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी आयोगापुढे सांगितले.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील अधिक्षक अभियंता यांचेकडे दाखल केले. प्रथम अपील दाखल झाल्यानंतर अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती संकलीत करण्यात आली आणि ते अपीलकर्त्यास दि. 24.6.2011 च्या पत्राने ती माहिती पोस्टाने पाठविली. परंतू अपीलकर्ता घरी नसल्यामुळे सदरची पोस्टाने पाठविलेली माहिती परत त्यांच्या कार्यालयाकडे आली म्हणून अपीलकर्त्यास पुन्हा दि. 14.7.2011 च्या पत्राने पोस्टाने कळवून कार्यालयातून माहिती घेवून जाण्या बाबत सूचना पत्र पाठविले. त्याला अनुसरुन अपीलकर्ता अधिक्षक अभियंता यांच्या कार्यालयात दि. 28.7.2011 रोजी हजर झाले आणि त्यांना दि. 27.7.2011 च्या पत्राने संलग्न केलेली माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे श्री बोरीकर प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता यांनी आयोगापुढे सांगितले.

6. सदरची माहिती अपीलकर्त्यास दि. 28.7.2011 रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र सदरची माहिती विलंबाने प्राप्त झाल्यामुळे संबंधीतावर कार्यवाही करण्याची मागणी केली आणि मुद्या क्र. 2, 8 आणि 11 ची अपूर्ण मिळालेली माहिती त्यांना पूर्ण मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

7. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 15.4. 2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्या कडून अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही किंवा त्या संदर्भातील उत्तर देखील अपीलकर्त्यास पाठविलेले दिसत नाही. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयातील Assistant Manager(Personal) वर्धा यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांना दि. 28.4.2011 च्या पत्राने त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्या बाबत कळविले होते. तथापी त्यांना 30 दिवसात कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झाला आहे. म्हणून या विलंबा बद्यल Assistant Manager(Personal) श्री यावलकर हे जबाबदार दिसून येतात. आजच्या सुनावणीस श्री यावलकर हे देखील आयोगापुढे हजर होते त्यांना विलंबाबद्यल खुलासा विचारला असता त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की ते नुकतेच या पदावर रुजू झालेले होते म्हणून त्यांच्या कडून 30 दिवसात माहिती उपलब्ध होवू शकली नाही. तथापी सदरचा खुलासा हा मान्य करण्या सारखा नाही कारण माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतूदी नुसार अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत माहिती प्राप्त होणे आवश्यक असते म्हणून श्री यावलकर यांच्याशी सदरची माहिती संबंधीत असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5 (5) प्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी समजण्यात येत असून ते विलंबाबद्यल कार्यवाहीस पात्र आहेत. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दि. 15.4.2011 च्या माहिती अर्जातील मुद्या क्र. 2, 8 आणि 11 च्या संदर्भातील अतिरिक्त माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता यांच्या दि. 15.4.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्या कडून अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही या विलंबास Assistant Manager(Personal) श्री यावलकर हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येत असून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु.

5000/– शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली श्री यावलकर यांच्या दरमहाचे वेतनातून कपात करुन लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा जमा करावी.

3) सदरच्या शास्तीची वसूली अधिक्षक अभियंता (स व सु प्रविभाग) महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. वर्धा यांनी करावयाची आहे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2353-2356

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1012 नाग/2011**

श्री देवआनंद राजाराम आडीकणे
गरोबा मैदान, हनुमान चौक नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) डॉ. सविता मेश्राम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा आरोग्य अधिकारी,
आरोग्य विभाग महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती रंजना लाडे
जन माहिती अधिकारी तथा सांख्यिकी अधिकारी,
जन्म–मृत्यू विभाग महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.10.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 12.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 5.4.2011 रोजी आणि दि. 6.4.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा सांख्यिकी अधिकारी, जन्म–मृत्यू विभाग महानगर पालिका नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली दोन स्वतंत्र अर्ज सादर करुन त्याचें आजोबा श्री सहदेव भिवाजी आडिकने यांचे सन 1968–1969 मधील मृत्यूच्या प्रमाणपत्राची आणि दि. 23.9.1985 रोजी त्यांचे वडील श्री राजाराम महादेव आडीकणे हे मृत्यू पावलेले होते म्हणून आजोबा आणि वडील यांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. परंतू त्यांना मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रती मिळाल्या नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील त्यांचे खारीज झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सांख्यिकी अधिकारी, जन्म–मृत्यू विभाग महानगर पालिका नागपूर श्रीमती रंजना लाडे हया हजर होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा आरोग्य अधिकारी डॉ. सविता मेश्राम हया हजर होत्या.

4. जन माहिती अधिकारी श्रीमती रंजना लाडे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 5.4.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 6.4.2011 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे 35 वर्षा पूर्वीची आणि 25 वर्षा पूर्वीची असल्यामुळे सदरची माहिती जन्म–मृत्यू विभागात उपलब्ध झाले नाही म्हणून अपीलकर्त्यास दि. 11.4.2011 च्या पत्राने कळविले. आणि त्यामध्ये असेही नमुद केले की मृत्यू प्रमाणपत्र प्राप्त करावयाचे असल्यास मुळ

घाट कॉपी प्रतिज्ञा पत्र विभागात सादर केल्यास त्यांच्या विभागा कडून एन ओ सी देण्यात येईल. त्याच प्रमाणे Executive Magistrate चा ऑर्डर प्राप्त केल्यास नोंदणी करण्यात येईल मात्र मुळ घाट कॉपी नसल्यास प्रतिज्ञा पत्राच्या आधारे आपणास जन्म–मृत्यू नोंदणी कायद्या अंतर्गत विभागा तर्फे एन ए फॉर्म (नोंदणी उपलब्ध नसल्याचे पत्र) प्राप्त करता येईल असे देखील अपीलकर्त्यास दि. 11.4.2011 च्या पत्राने कळविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील आरोग्य विभाग यांचेकडे दाखल केले. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही जुनी असल्यामुळे ती उपलब्ध होवू शकत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 11.4.2011 च्या पत्राने कळविले असल्यामुळे अपीलकर्त्याचे प्रथम अपील खारीज केल्याचे डॉ. सविता मेश्राम यांनी आयोगापुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती वर नमुद केल्याप्रमाणे 20 वर्षा पूर्वीची असल्यामुळे ती उपलब्ध होवू शकली नाही म्हणून मृत्यू प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे नोंदणी उपलब्ध नसल्याचे पत्र (एन ए फॉर्म) अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे मृत्यूचे प्रमाणपत्र ऐवजी एन ए फॉर्म (नोंदणी उपलब्ध नसल्याचे पत्र) अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2358-2359

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1015 नाग/2011 व अपील क्रमांक 1016 नाग/2011**

श्री पांडुरंग मेघशाम मेश्राम
मु. पो. ठाणेगाव
ता. आरमोरी जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती आरमोरी
ता. आरमोरी जि. गडचिरोली
2) श्री ए. एन. डाखरे
जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत ठाणेगाव
ता. आरमोरी जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.10.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.6.2011 रोजी अपील क्रमांक 1015 नाग/2011 व अपील क्रमांक 1016 नाग/2011 राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. या दोन्ही द्वितीय अपीलांमध्ये अपीलकर्ता हे एकच आहेत. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी हे एकच असल्यामुळे दोन्ही अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यासाठी आयोगाचे कार्यालयातून दि. 9.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 12.10.2011 रोजी दोन्ही द्वितीय अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. **<u>अपील क्रमांक 1015 नाग/2011</u>** – आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 12.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत ठाणेगाव यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन तंटामुक्त समिती मधील शिल्लक रकमेतील मुत्रीघरासाठी झालेल्या खर्चाची माहिती मिळण्याबाबत त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती आरमोरी यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत ठाणेगाव श्री ए. एन. डाखरे हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा यांच्या वतीने श्री बोकडे हे हजर होते.

4. जन माहिती अधिकारी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 12.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 13.1.2011 रोजी प्राप्त झाला होता. तथापी त्यावेळी ग्रामविकास अधिकारी म्हणून श्री पी. पी. हुड हे कार्यरत होते. त्यांनी 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यानंतर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती तयार केली आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास दि. 13.9.2011 च्या पत्राने शिपाया मार्फत पाठविली. तथापी अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलले असल्यामुळे त्यांनी ती माहिती स्वीकारली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावयाच्या मुद्यांची माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी सोबत आणलेली असल्याचे आयोगापुढे सांगितले म्हणून सदरची माहिती आयोगा समोर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली.

5. यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती आरमोरी यांचेकडे दाखल केले. संवर्ग विकास अधिकारी यांनी दि. 10.3.2011 च्या पत्राने सचिवांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे लेखी पत्र पाठविले. तथापी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री पी. पी. हुड यांनी अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री बोकडे यांनी आयोगापुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 12.1. 2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री पी. पी. हुड यांनी अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदरची माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर अपीलकर्त्यास विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली. म्हणून अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत माहिती उपलब्ध न होण्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री पी. पी. हुड हे जबाबदार दिसून येतात. म्हणून विलंबाबद्यल त्यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही लादण्यात येवू नये याचा खुलासा त्यांच्या कडून मागणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

7. <u>**अपील कमांक 1016 नाग/2011**</u> – आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 112.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत ठाणेगाव यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत झालेल्या ग्रा. पं. अंतर्गत मा. मा. तलावाच्या कामाच्या बाबत त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती

अधिकारी यांचेकडून 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती आरमोरी यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

8. आजच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत ठाणेगाव श्री ए. एन. डाखरे हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा यांच्या वतीने श्री बोकडे हे हजर होते.

9. जन माहिती अधिकारी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 12.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 13.1.2011 रोजी प्राप्त झाला होता. तथापी त्यावेळी ग्रामविकास अधिकारी म्हणून श्री पी. पी. हुड हे कार्यरत होते. त्यांनी 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यानंतर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती तयार केली आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास दि. 13.9.2011 च्या पत्राने शिपाया मार्फत पाठविली. तथापी अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलले असल्यामुळे त्यांनी ती माहिती स्वीकारली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावयाच्या मुद्यांची माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी सोबत आणलेली असल्याचे आयोगापुढे सांगितले म्हणून सदरची माहिती आयोगा समोर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली.

10. यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती आरमोरी यांचेकडे दाखल केले. संवर्ग विकास अधिकारी यांनी दि. 10.3.2011 च्या पत्राने सचिवांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे लेखी पत्र पाठविले. तथापी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री पी. पी. हुड यांनी अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री बोकडे यांनी आयोगापुढे सांगितले.

11. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 12.1. 2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री पी. पी. हुड यांनी अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदरची माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर अपीलकर्त्यास विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली. म्हणून अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत माहिती उपलब्ध न होण्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री पी. पी. हुड हे जबाबदार दिसून येतात. म्हणून विलंबाबद्यल त्यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही लादण्यात येवू नये याचा खुलासा त्यांच्या कडून मागणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक 1015 नाग/2011 व अपील क्रमांक 1016 नाग/2011 हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

2) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री पी. पी. हुड यांनी अपीलकर्त्याच्या दि. 12. 1.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसात अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला आहे. सदरच्या विलंबास श्री हुड हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 5000/– शास्तीची कार्यवाही कां लादण्यात येवू नये याबद्यलचा लेखी खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 105 दिवसाचे आंत आयोगापुढे सादर करावा. अन्यथा शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

3) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत ठाणेगाव श्री ए. एन. डाखरे यांनी या निर्णयाची एक प्रत श्री पी. पी. हुड तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडे खुलासा करण्यासाठी पाठवावी आणि सदरची प्रत श्री पी. पी. हुड यांना प्राप्त झाल्याची पोच त्यांच्याकडे प्राप्त करुन घ्यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

Ageyord6.2353-2356

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 976 नाग/2011**

श्री पांडूरंग गणपतराव सपकाळ
रा. करंभाड
पो. ता. पारशिवनी जि. नागपूर –441105 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गिरीष जोशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय पारशिवनी
ता. पारशिवनी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.10.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 6.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 13.10.2011 रोजी घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 3.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी उपविभागीय अधिकारी, रामटेक यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मौजा करंभाड प.ह.नं.6 भू. क्र. 657/2 गावठाण विस्तार योजने आंतर्गत संपादित क्षेत्र 4 हेक्टर भुखंड वाटप संख्या 246 या संदर्भात एकुण 1 ते 15 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार पारशिवनी यांचेकडून विलंबाने माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती त्यांच्या माहिती अर्जातील 1 ते 15 मुद्यांला अनुसरुन मुद्येनिहाय नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री व्ही. ए. चांभारे पारशिवनी हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, रामटेक श्री गिरीष जोशी हे हजर होते.

4. जन माहिती अधिकारी श्री व्ही. ए. चांभारे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 13.4.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 29.4.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती यापूर्वीच त्यांना पाठविण्यात आली होती. तथापी त्यानंतर पुन्हा दि. 22.9.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. दि. 22.9.2011 च्या पत्राने पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास दि. 28.9.2011 रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र त्यांच्या दि. 13.4.2011 च्या माहिती अर्जातील माहिती प्रमाणे 1 ते 15 मुद्यांची माहिती मुद्येनिहाय प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, श्री गिरीष जोशी हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा प्रथम अपीलाचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. मात्र प्रस्तूत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी हे तहसिलदार पारशिवनी असल्यामुळे त्यांनी दि. 18.5.2011 च्या पत्राने तहसिलदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले होते. आणि प्रस्तूत प्रकरणात तहसिलदार पारशिवनी हे प्रथम अपीलीय अधिकारी असल्यामुळे त्यांनीच प्रथम अपीलाचा निर्णय देणे अपेक्षित होते असे श्री गिरीष जोशी यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र प्रस्तूत प्रकरणात उपविभागीय अधिकारी रामटेक किंवा तहसिलदार पारशिवनी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला नाही अपीलकर्त्यास म्हणून दि. 13.4.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन महिती उपलब्ध करुन द्यावयाच्या माहितीच्या संबंधाने प्रस्तूत प्रकरणात आता उपविभागीय अधिकारी रामटेक यांनी सुनावणी घ्यावी. सदरच्या सुनावणीत अपीलकर्ता आणि जन माहिती अधिकारी यांना बोलवावे आणि अपीलकर्त्यास त्यांच्या दि. 13.4.2011 च्या माहिती अर्जातील 1 ते 15 मुद्यांची मुद्येनिहाय माहिती अद्यापपर्यंत जन माहिती अधिकारी यांचेकडून उपलब्ध झाली नसल्यास ती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत उपविभागीय अधिकारी रामटेक अपीलकर्त्याच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेवून प्रथम अपीलाचा निर्णय देवून माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी.

2) उपविभागीय अधिकारी रामटेक यांनी तहसिलदार पारशिवनी यांचेकडे दि. 18.5. 2011 च्या पत्राने प्रथम अपीलाचा अर्ज पाठविल्याचे उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. मात्र प्रस्तूत प्रकरणात तहसिलदार पारशिवनी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला नाही म्हणून तहसिलदार पारशिवनी यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी याबाबतची पुनरावृत्ती करु नये अशी समजही त्यांना देण्यात येत आहे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2358-2360

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1015 नाग/2011 व अपील क्रमांक 1016 नाग/2011**

श्री पांडुरंग मेघशाम मेश्राम
मु. पो. ठाणेगाव
ता. आरमोरी जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती आरमोरी
ता. आरमोरी जि. गडचिरोली
2) श्री ए. एन. डाखरे
जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत ठाणेगाव
ता. आरमोरी जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.10.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.6.2011 रोजी अपील क्रमांक 1015 नाग/2011 व अपील क्रमांक 1016 नाग/2011 राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. या दोन्ही द्वितीय अपीलांमध्ये अपीलकर्ता हे एकच आहेत. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी हे एकच असल्यामुळे दोन्ही अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यासाठी आयोगाचे कार्यालयातून दि. 9.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 12.10.2011 रोजी दोन्ही द्वितीय अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. **अपील क्रमांक 1015 नाग/2011** – आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 12.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत ठाणेगाव यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन तंटामुक्त समिती मधील शिल्लक रकमेतील मुत्रीघरासाठी झालेल्या खर्चाची माहिती मिळण्याबाबत त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती आरमोरी यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत ठाणेगाव श्री ए. एन. डाखरे हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री बोकडे हे हजर होते.

4. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 12.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 13.1.2011 रोजी प्राप्त झाला होता. तथापी त्यावेळी ग्रामविकास अधिकारी म्हणून श्री पी. पी. हुड हे कार्यरत होते. त्यांनी 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यानंतर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती तयार केली आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास दि. 13.9.2011 च्या पत्राने शिपाया मार्फत पाठविली. तथापी अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलले असल्यामुळे त्यांनी ती माहिती स्वीकारली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावयाच्या मुद्यांची माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी सोबत आणलेली असल्याचे आयोगापुढे सांगितले म्हणून सदरची माहिती आयोगा समोर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली.

5. तथापी याबाबत अपीलकर्त्याने प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती आरमोरी यांचेकडे दाखल केले. संवर्ग विकास अधिकारी यांनी दि. 10.3.2011 च्या पत्राने सचिवांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे लेखी पत्र पाठविले. तथापी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री पी. पी. हुड यांनी अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री बोकडे यांनी आयोगापुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 12.1. 2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री पी. पी. हुड यांनी अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदरची माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. म्हणून अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत माहिती उपलब्ध न होण्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री पी. पी. हुड हे जबाबदार दिसून येतात. म्हणून विलंबाबद्यल त्यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही का लादण्यात येवू नये याचा खुलासा त्यांच्या कडून मागणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

7. **<u>अपील कमांक 1016 नाग/2011</u>** — आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 11.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत ठाणेगाव यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत झालेल्या ग्रा. पं. अंतर्गत मा. मा. तलावाच्या कामाच्या बाबत त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती

अधिकारी यांचेकडून 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती आरमोरी यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

8. आजच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत ठाणेगाव श्री ए. एन. डाखरे हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा यांच्या वतीने श्री बोकडे हे हजर होते.

9. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 11.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 13.1.2011 रोजी प्राप्त झाला होता. तथापी त्यावेळी ग्रामविकास अधिकारी म्हणून श्री पी. पी. हुड हे कार्यरत होते. त्यांनी 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यानंतर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती तयार केली आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास दि. 13.9.2011 च्या पत्राने शिपाया मार्फत पाठविली. तथापी अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलले असल्यामुळे त्यांनी ती माहिती स्वीकारली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावयाची माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी सोबत आणलेली असल्याचे आयोगापुढे सांगितले म्हणून सदरची माहिती आयोगा समोर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली.

10. तथापी याबाबत अपीलकर्त्याने प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती आरमोरी यांचेकडे दाखल केले. संवर्ग विकास अधिकारी यांनी दि. 10.3.2011 च्या पत्राने सचिवांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे लेखी पत्र पाठविले. तथापी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री पी. पी. हुड यांनी अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री बोकडे यांनी आयोगापुढे सांगितले.

11. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 11.1. 2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री पी. पी. हुड यांनी अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदरची माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. म्हणून अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत माहिती उपलब्ध न होण्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री पी. पी. हुड हे जबाबदार दिसून येतात. म्हणून विलंबाबद्यल त्यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही का लादण्यात येवू नये याचा खुलासा त्यांच्या कडून मागणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक 1015 नाग/2011 व अपील क्रमांक 1016 नाग/2011 हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.
2) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री पी. पी. हुड यांनी अपीलकर्त्याच्या दि. 12. 1.2011 च्या आणि दि. 11.1.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसात अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला आहे. सदरच्या विलंबास श्री हुड हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 5000/- शास्तीची कार्यवाही कां लादण्यात येवू नये याबद्यलचा लेखी खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगापुढे सादर करावा. अन्यथा शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
3) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत ठाणेगाव श्री ए. एन. डाखरे यांनी या निर्णयाची एक प्रत श्री पी. पी. हुड तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडे खुलासा करण्यासाठी पाठवावी आणि सदरची प्रत श्री पी. पी. हुड यांना प्राप्त झाल्याची पोच त्यांच्याकडे प्राप्त करुन घ्यावी.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2353-2356

जा.क्र.---------- दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 976 नाग/2011**

श्री पांडूरंग गणपतराव सपकाळ
रा. करंभाड
पो. ता. पारशिवनी जि. नागपूर –441105 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गिरीष जोशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय पारशिवनी
ता. पारशिवनी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.10.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 6.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 13.10.2011 रोजी घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 3.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी उपविभागीय अधिकारी, रामटेक यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मौजा करंभाड प.ह.नं.6 भू. क्र. 657/2 गावठाण विस्तार योजने आंतर्गत संपादित क्षेत्र 4 हेक्टर भुखंड वाटप संख्या 246 या संदर्भात एकुण 1 ते 15 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार पारशिवनी यांचेकडून विलंबाने माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती त्यांच्या माहिती अर्जातील 1 ते 15 मुद्यांला अनुसरुन मुद्येनिहाय नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री व्ही. ए. चांभारे पारशिवनी हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, रामटेक श्री गिरीष जोशी हे हजर होते.

4. जन माहिती अधिकारी श्री व्ही. ए. चांभारे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 13.4.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 29.4.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती यापूर्वीच त्यांना पाठविण्यात आली होती. तथापी त्यानंतर पुन्हा दि. 22.9.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. दि. 22.9.2011 च्या पत्राने पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास दि. 28.9.2011 रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र त्यांच्या दि. 13.4.2011 च्या माहिती अर्जातील माहिती प्रमाणे 1 ते 15 मुद्यांची माहिती मुद्येनिहाय प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, श्री गिरीष जोशी हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा प्रथम अपीलाचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. मात्र प्रस्तूत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी हे तहसिलदार पारशिवनी असल्यामुळे त्यांनी दि. 18.5.2011 च्या पत्राने तहसिलदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले होते. तसेच प्रस्तूत प्रकरणात तहसिलदार पारशिवनी हे प्रथम अपीलीय अधिकारी असल्यामुळे त्यांनीच प्रथम अपीलाचा निर्णय देणे अपेक्षित होते असे देखील श्री गिरीष जोशी यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र प्रस्तूत प्रकरणात उपविभागीय अधिकारी रामटेक किंवा तहसिलदार पारशिवनी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला नाही म्हणून अपीलकर्त्यास दि. 13.4.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन

महिती उपलब्ध होण्यासाठी प्रस्तूत प्रकरणात आता उपविभागीय अधिकारी रामटेक यांनी सुनावणी घ्यावी. सदरच्या सुनावणीत अपीलकर्ता आणि जन माहिती अधिकारी यांना बोलवावे आणि अपीलकर्त्यास त्यांच्या दि. 13.4.2011 च्या माहिती अर्जातील 1 ते 15 मुद्यांची मुद्येनिहाय माहिती अद्यापपर्यंत जन माहिती अधिकारी यांचेकडून उपलब्ध झाली नसल्यास ती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत उपविभागीय अधिकारी रामटेक यांनी अपीलकर्त्याच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेवून प्रथम अपीलाचा निर्णय देवून माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी.

2) उपविभागीय अधिकारी रामटेक यांनी तहसिलदार पारशिवनी यांचेकडे दि. 18.5. 2011 च्या पत्राने प्रथम अपीलाचा अर्ज पाठविल्याचे उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. मात्र प्रस्तूत प्रकरणात तहसिलदार पारशिवनी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला नाही म्हणून तहसिलदार पारशिवनी यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी याबाबतची पुनरावृत्ती करु नये अशी समजही त्यांना देण्यात येत आहे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2358-2360

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1033 नाग/2011, अपील क्रमांक 1034 नाग/2011 व अपील क्रमांक 1035 नाग/2011**

श्री नानाजी जैदास रामटेके
रा. जानवा पो. ईटखेंडा
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा न्यायालय भंडारा
ता. जि. भंडारा
2) श्री वाय. आर. साठवणे
जन माहिती अधिकारी
दिवाणी न्यायालय अर्जुनी/मोर.
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.10.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये वर नमुद केलेली तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. तीन्ही अपीलांमध्ये अपीलकर्ता हे एकच असून जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी हे देखील एकच आहेत. म्हणून तीन्ही अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यासाठी आयोगाचे कार्यालयातून दि. 21.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 17.10.2011 रोजी तीन्ही द्वितीय अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या तीन्ही अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी अपील क्रमांक 1033 नाग/2011 मध्ये दि. 11.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी दिवाणी न्यायालय अर्जुनी/मोर. ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मोटर पंप, पाईप चोरी, बील न देता दुस–याचे पंपाने पाणी घेणे देणे, मकान बांधकाम रूपये मिळण्या करीता तालुका विधी सेवा प्राधिकरण मोर. अर्जुनी यांचेकडे अर्ज केला होता. तसेच अपील क्रमांक 1034 नाग/2011 मध्ये दि. 11.11.2010 रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व ग्रामपंचायत जानवा येथील बांधकाम नुकसान भरपाई मिळण्या करीता दोन अर्ज दाखल केल्या नुसार राजेश पालीवाल अधिवक्ता यांची नेमणूक करण्यात आली होती. व त्यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. तसेच अपील क्रमांक 1035 नाग/2011 मध्ये दि. 22.11.2010 रोजी अर्ज सादर करुन नुतन हिंदी हायस्कूल अरुण नगर शाळेचे बांधकाम रुपये मिळण्याबाबत केलेल्या अर्जा नुसार दि. 1.7.2009 ला पी. एस. रामटेके अधिवक्ता यांची नेमणूक करण्यात आली ती केस चालू करण्याबाबत त्यांनी माहितीच्या अर्जात विनंती केली होती. तथापी त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन द्वितीय अपीले दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक श्री वाय. आर. साठवणे जिल्हा न्यायालय हे हजर होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे वर नमुद केलेले तीन्ही

माहिती अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होते. तथापी अपीलकर्त्याने अपील क्रमांक 1034 नाग/2011 अन्वये त्यांचेकडे दि. 11.11.2010 रोजी माहितीचा अर्ज केला होता. तथापी सदरच्या माहितीच्या अर्जावर रु. 10/– चा कोर्ट फी स्टॅम्प लावलेला नाही म्हणून अपीलकर्त्याचा दि. 11.11. 2010 चा माहितीचा अर्ज ना मंजूर करण्यात येवून अपीलकर्त्यास दि. 18.11.2010 रोजी तसे कळविले.

4. त्याचप्रमाणे अपीलकर्त्याच्या अपील क्रमांक 1033 नाग/2011 च्या संदर्भात अपीलकर्त्यास दि. 18.11.2010 रोजी माहितीच्या अर्जात माहिती मिळण्यासाठी असे कळविले की अपीलकर्त्याने मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील अधीसूचना दि. 3.9.2009 चे शासन राजपत्रात प्रसिध्द केल्यानुसार महाराष्ट्र राज्य जिल्हा न्यायालय माहितीचा अधिकार अधिनियम 2009 चे नियम 10 (3) व 13 (फ) मध्ये केल्या नुसार न्यायीक कामकाज किंवा अभिलेख या मधील प्रमाणीत प्रती संबंधीत न्यायालयातून नियमा नुसार प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यात यावी असे अर्जदारास कळविले आणि अपील क्रमांक 1035 नाग/2011 च्या संदर्भात अपीलकर्त्यास दि. 3.12.2010 च्या पत्राने असे कळविले की मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील दि. 3.9.2009 प्रमाणे जिल्हा न्यायालय माहितीचा अधिकार अधिनियम 2009 नुसार आवेदना सोबत रजिस्टर पोस्ट अे. डी. पोस्टल तिकीट लिफाफा जोडणे आवश्यक आहे. अपीलकर्त्याने आवेदना सोबत लिफाफा जोडलेला नसल्यामुळे माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता आली नाही असे अपीलकर्त्यास त्यांनी कळविले.

5. तथापी त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा न्यायालय भंडारा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्त्यास बोलाविण्यात आले. तथापी अपीलकर्ता तीन्ही प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर झाले नाही. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या तीन्ही अपीलांमध्ये कळविलेला निर्णय कायम करुन तीन्ही प्रथम अपीले खारीज केले असे जन माहिती अधिकारीयांनी आयोगापुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपील क्रमांक 1034 नाग/2011 माहितीच्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे राजेश पालीवाल अधिवक्ता यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना मिळणे आवश्यक आहे कारण ते दारीद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती मिळणे जरुरीचे आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. म्हणून प्रस्तूत प्रकरणात अपीलकर्ता हे दारीद्रय रेषेखालील असल्यामुळे श्री राजेश पालीवाल या वकीलानी अपीलकर्त्याच्या केस मध्ये केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी प्रस्तूत प्रकरणी श्री राजेश पालीवाल अधिवक्ता यांनी अपीलकर्त्याच्या केस मध्ये केलेल्या कार्यवाहीची माहिती प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच अपीलकर्त्याच्या अपील क्रमांक 1033 नाग/2011 आणि अपील क्रमांक 1035 नाग/2011 मधील प्रकरणात अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की या दोन्ही केसेस चालू करण्याबाबत तालुका विधी सेवा प्राधिकरणाकडे जन माहिती अधिकारी यांनी पत्र पाठवून विनंती करावी असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. आणि त्या प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी असे पत्र पाठविल्याचे मान्य केले म्हणून अपीलकर्ता यांचे वर नमुद केलेली तीन्ही अपीले अंशतः मंजुर करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक 1034 नाग/2011 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या केस

मध्ये श्री राजेश पालीवाल अधिवक्ता यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य संबंधीताकडून प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्त्याचे अपील क्रमांक 1033 नाग/2011 आणि अपील क्रमांक 1035 नाग/2011 ही दोन्ही अपीले अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या माहिती अर्जात नमुद केलेल्या अर्जाला अनुसरुन केस सुरु करण्याबाबत तालुका विधी सेवा प्राधिकरणाकडे एक विनंती पत्र पाठवावे आणि त्याची प्रत अपीलकर्त्यास द्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2361-2363

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1045 नाग/2011**

श्री प्रशांत अशोक सत्राळकर
ऑल सेंट हाऊस कंपाऊंड, व्ही सी ए समोर,
सदर नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याध्यापिका
सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूल, सिव्हील लाईन्स, नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी
सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूल, सिव्हील लाईन्स, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.10.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.7.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 18.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. अपीलकर्ता यांनी दिनांक 15.10.2011 रोजी सादर केलेल्या पत्रा नुसार संबंधीत माहिती प्राप्त झालेली असून सदरचे द्वितीय अपील मागे घेत असल्याचे आयोगाकडे पत्र सादर केले असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

Ageyord6.2363-

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1046 नाग/2011, अपील क्रमांक 1047 नाग/2011 व अपील क्रमांक 1048 नाग/2011**

**अपील क्रमांक 1046 नाग/2011**

श्री भाऊराव झिंगूजी गोहत्रे
59, बंडू सोनी ले–आऊट परसोडी नागपूर
ता. जि. नागपूर – 22 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री विनोद पाटील उप आयुक्त
प्रथम अपीलीय अधिकारी तथा वरीष्ठ संशोधन अधिकारी,
कार्यालय अपर आयुक्त, आदिवासी विकास नागपूर
गिरीपेठ नागपूर
2) श्री व. मा. जवळे
जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी,
कार्यालय अपर आयुक्त, आदिवासी विकास नागपूर
गिरीपेठ नागपूर ..... **उत्तरवादी**

**अपील क्रमांक 1047 नाग/2011**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह. आयुक्त
आदिवासी विकास आयुक्तालय, म.रा.नाशिक
पहिला मजला, गडकरी चौक,
जुना आग्रा रोड नाशिक 422002
2) जन माहिती अधिकारी
आदिवासी विकास आयुक्तालय, म.रा.नाशिक
पहिला मजला, गडकरी चौक,
जुना आग्रा रोड नाशिक 422002 ..... **उत्तरवादी**

**अपील क्रमांक 1048 नाग/2011**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर

2) श्री डी. डी. एकापूरे
जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.10.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.7.2011 रोजी अपील क्रमांक 1046 नाग/2011 अपील क्रमांक 1047 नाग/2011 व अपील क्रमांक 1048 नाग/2011 अशी तीन द्वितीय अपीले राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 29.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 19.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. वरील तीन्ही द्वितीय अपीलांमधे अपीलकर्ता हे एकच आहेत तसेच तीन्ही अपीलांमधील मागितलेल्या माहितीचे स्वरुप देखील एकच आहे म्हणून तीन्ही अपीलांची एकत्रित सुनावणी घेवून एकत्रित निर्णय देण्यात आला.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपील क्रमांक 1046 नाग/2011 मध्ये जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी, अपर आयुक्त, कार्यालय आदिवासी विकास नागपूर यांचेकडे त्याचप्रमाणे अपील क्रमांक 1047 नाग/2011 मध्ये जन माहिती अधिकारी आदिवासी विकास आयुक्तालय नाशिक यांचेकडे दि. 25.4.2011 च्या माहिती अर्जा खालील अर्जान्वये आणि अपील क्रमांक 1048 नाग/2011 मध्ये दि. 25.4.2011 च्या माहिती अर्जा खालील अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चिमूर यांचेकडे तीन स्वतंत्र अर्ज सादर करुन कु. वैशाली भाऊराव गोहत्रे माजी आदिवासी विकास निरीक्षक चिमूर यांच्या गैरहजेरी बाबत त्यांची बिनपगारी रजा मंजूर करण्याबाबत व त्यांच्या सेवा पुस्तकातील नोंदी बाबत वेगवेगळे मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. तथापी त्यांना समाधानकारक माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे वर नमुद केलेली तीन द्वितीय अपीले दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी, अपर आयुक्त, कार्यालय आदिवासी विकास नागपूर श्री जवळे हे हजर होते. तसेच जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चिमूर श्री एकापूरे हे हजर होते. अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी आदिवासी विकास आयुक्तालय नाशिक यांचेकडे पाठविलेला दि. 25.4.2011 चा माहितीचा अर्ज हा अपर

आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय नागपूर यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांचेकडे दि. 5.5.2011 च्या पत्राने हस्तांतरण केलेला आहे.

4. जन माहिती अधिकारी श्री जवळे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 19.4.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 25.4.2011 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली. आणि अपीलकर्त्यास दि. 19.5.2011 च्या पत्राने माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क दि. 30.5.2011 रोजी भरले आणि त्यानंतर दि. 1.6.2011 रोजी अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी 1 ते 10 मुद्यांची त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती आणि वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी रजिस्टर पोस्टाने पाठविल्या बाबत आयोगा समोर पुरावा सादर केला.

5. मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील वरीष्ठ संशोधन अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 27.7.2011 रोजी घेण्यात आली सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर होते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचे म्हणणे एकून घेवून दि. 27.6.2011 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमीत केला आणि त्या निर्णयात असे नमुद केले की अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात मागितलेल्या 1 ते 10 मुद्यांपैकी 7 मुद्यांच्या बाबत अपीलकर्त्याने समाधान व्यक्त केले. मात्र मुद्या क्र. 1, 7 आणि 10 बाबतची माहिती त्यांना त्यांच्या अपेक्षे प्रमाणे मिळाली नाही असे त्यांनी प्रथम अपीलात नमुद केले. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपीलाच्या निर्णयात मुद्या क्र. 1, 7 आणि 10 च्या संदर्भातील माहिती अपीलकर्त्यास देण्याबाबत निर्णय दिला.

6. प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा अपीलकर्त्यास दि. 2.7.2011 च्या पत्राने मुद्या क्र. 1 आणि 10 ची माहिती उपलब्ध करुन दिली आणि 7 ची माहिती प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अहेरी जिल्हा गडचिरोली यांनी दि. 16.9.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली.

7. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चिमूर यांचेकडे दि. 25.4.2011 च्या माहितीच्या अर्जाने जी माहिती मागितलेली आहे ती माहिती देखील जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीच्या अर्जा पूर्वीच दि. 18.9.2009, दि. 1.3.2011 रोजी उपलब्ध करुन दिलेली होती. म्हणून अपीलकर्त्यास त्यांनी निरीक्षणासाठी त्यांच्या कार्यालयात बोलविले त्याप्रमाणे अपीलकर्ता त्यांच्या कार्यालयात माहितीच्या निरीक्षणासाठी दि. 22.7.2011 रोजी आले. त्यांनी माहितीचे निरीक्षण करुन घेवून त्यांना पाहिजे असलेली माहिती उपलब्ध करुन दिल्याचे जन माहिती अधिकारी चिमूर यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी आदिवासी विकास आयुक्तालय नाशिक यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली

कार्यालयाकडे आणि जन माहिती अधिकारी चिमूर यांच्या कार्यालयाकडे केलेल्या माहितीच्या अर्जात देखील तीच माहिती मागितलेली होती. म्हणून अपीलकर्त्याने तीन्ही माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती वर नमुद केल्या प्रमाणे अपीलकर्त्यास पाठविल्याचे तीन्ही जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तीन्ही जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे आयोगापुढे त्यांनी मान्य केले. माहिती मिळाल्या बाबत त्यांनी आयोगापुढे समाधान व्यक्त केले. म्हणून अपीलकर्ता यांची तीन्ही अपीले खारीज करण्यात येत आहे.

## **आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील कमांक 1046 नाग/2011 अपील कमांक 1047 नाग/2011 व अपील कमांक 1048 नाग/2011 ही तीन्ही अपीले खारीज करण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2365-2368

जा.क.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1050 नाग/2011

श्री दिलीप चंभरुजी साकुरे
देवकी किराणा स्टोअर्स जवळ, क्रांती वार्ड भंडारा
ता. जि. भंडारा –441904 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. पी. भूसारी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक
म.रा.मार्ग परिवहन महामंडळ भंडारा
ता. जि. भंडारा
2) श्री अशोक परशुरामे
जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी अधिकारी,
म.रा.मार्ग परिवहन महामंडळ भंडारा
ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.10.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.7.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 29.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 19.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 31.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी अधिकारी, म.रा.मार्ग परिवहन महामंडळ भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन वाहक (कनिष्ठ) या पदावर खुल्या प्रवर्गातील ज्या उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात आलेले आहे त्या संदर्भात त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 21.2.2011 च्या पत्राने त्यांचे स्वतःचे लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांची माहिती त्यांना कळविली. मात्र खुल्या प्रवर्गातील इतर उमेदवारांचे गुण किंवा त्यांची निवउ यादी आणि त्यांच्या सर्वांच्या उत्तरपत्रीकेच्या प्रती त्यांना मिळाल्या नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विभाग नियंत्रक म.रा.मार्ग परिवहन महामंडळ भंडारा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 26.4.2011 ला घेण्यात आली मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी श्री परशुरामे हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी श्री भुसारी हे हजर होते.

4. जन माहिती अधिकारी श्री परशुरामे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 31.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन त्यांनी अपीलकर्त्यास दि. 21.2.2011 च्या पत्राने असे कळविले की वाहक पदाच्या लेखी परीक्षेस बसलेल्या उमेदवारांची उत्तर पत्रिका ही बाहय संस्थेच्या ताब्यात असल्याने त्याची झेरॉक्स प्रत देता येणे शक्य नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार आपणास वाहक पदाच्या लेखी परीक्षेत 47 गुण मिळालेले असून प्रत्यक्ष मुलाखतीत 5.33 गुण दिलेले आहे अशी माहिती अपीलकर्त्यास त्यांनी उपलब्ध करुन दिली असल्याचे त्यांनी सांगीतले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे प्रस्तूत प्रकरणी असे म्हणणे आहे की खुल्या प्रवर्गातून वाहक पदासाठी निवड झालेल्या सर्व उमेदवाराच्या निवडीची यादी त्याचप्रमाणे त्यांना मिळालेले लेखी व तोंडी परीक्षेतील गुण इत्यादीची माहिती त्यांना मिळणे आवश्यक आहे. म्हणून त्यांनी प्रथम अपील विभाग नियंत्रक म.रा.मार्ग परिवहन महामंडळ भंडारा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी श्री भुसारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की प्रस्तूत प्रकरणी तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी श्री गोहत्रे यांनी प्रथम अपीलाची सुनावणी दि. 26.4.2011 ला घेतली होती आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 3.5.2011 रोजी देण्यात आला होता. आणि सदरच्या निर्णयात वाहक पदा करीता नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवाराची गुणांची यादी त्यांनी त्या करीता येणारा खर्च भरणा करुन उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले होते. मात्र अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा केले नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र याबाबत अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले की जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना अपेक्षित माहिती 30 दिवसाच्या मुदतीत मिळाली नाही म्हणून त्यांना विनामुल्य माहिती मिळणे आवश्यक आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 21.2.2011 च्या पत्राने फक्त अपीलकर्त्याचे लेखी व तोंडी परीक्षेतील गुण कळविलेले आहे. मात्र अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात खुल्या प्रवर्गातील सर्व उमेदवाराच्या निवडीची यादी आणि त्यांना मिळालेले गुण इत्यादीची माहिती मागितलेली होती. तसेच सर्व उमेदवारांच्या उत्तर पत्रिकेची प्रत देखील त्यांनी मागितलेली होती. तथापी सदरची माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत आहे म्हणून त्या सर्वांच्या उत्तर पत्रिका त्यांना उपलब्ध करुन देणे योग्य होणार नाही तथापी अपीलकर्त्याने आयोगापुढे असे सांगीतले की त्यांना खुल्या प्रवर्गातून वाहक पदासाठी निवड केलेल्या सर्व उमेदवाराच्या निवडीची यादी त्याचप्रमाणे त्यांना मिळालेले लेखी व

तोंडी परीक्षेतील गुण इत्यादीची माहिती देण्यात यावी म्हणून अपीलकर्त्यास वाहक पदाच्या निवड प्रक्रियेत ज्या उमेदवारांची खुल्या प्रवर्गातून निवड केलेली आहे त्या संदर्भातील लेखी व तोंडी परीक्षेत मिळालेल्या गुणांसह यादी विनामुल्य व्यक्तशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक व न्यायोचित होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास खुल्या प्रवर्गातून वाहक पदासाठी निवड झालेल्या सर्व उमेदवाराच्या लेखी व तोंडी परीक्षेत मिळालेल्या गुणांची यादी विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2368-2370

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील 1049 नाग/2011**

श्री राजेंद्र चंद्रशेखर नायडू
मेदी राममंदीर जवळ कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक
भूमी अभिलेख कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री यु. एन. घरडे
जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक
भूमी अभिलेख कार्यालय कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.10.2011 )**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.7.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 19.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 12.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक भूमी अभिलेख कामठी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन 1) शीट नं.6 ब्लॉक 51 मधील घर क्र. के 14 व के 15 च्या क्षेत्रफळा बाबत तफावत असल्या संबंधाने घर क्र. के 14 व के 15 ची नक्की आराजी बाबत माहिती मागितलेली होती. 2) नकाशा वरुन मोजणीत दोन्ही घराची आराजी 280 चौ.मी.भरते असे पत्रात नमुद आहे. बांधकाम 304 चौ.मी.क्षेत्रफळात आहे. तर जास्तीचे बांधकाम केलेली जागा अतिक्रमण आहे वा कसे त्याची माहिती व दस्तऐवज त्यांनी मागितलेले होते. तथापि त्यांना 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली नाही त्यानंतर त्यांना दि. 22.2.2011 च्या पत्राने म्हणजे विलंबाने माहिती प्राप्त झाली. मात्र ती माहिती समाधानकारक नसल्याने त्यांनी प्रथम अपील जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय 30 दिवसात दिला नाही म्हणून जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

3. आजच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक भूमी अभिलेख कामठी श्री घरडे हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख यांच्या वतीने श्री भुते प्रमुख लिपीक हे हजर होते.

4. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक भूमी अभिलेख कामठी श्री घरडे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 12.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्यावेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री लव्हारे

हे कार्यरत होते. त्यांनी अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला 30 दिवसात कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही मात्र त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 22.2.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिल्याचे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर यांचेकडे दाखल केले. आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 11.4.2011 रोजी देण्यात आल्याचे श्री भुते यांनी आयोगापुढे सांगितले.

5. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असेही सांगितले की अपीलकर्त्याने त्यांच्या कार्यालयाकडे मागितलेल्या माहितीच्या संदर्भात मिळकत क्र. के 14 व के 15 या मिळकती बाबत मोजणी अर्ज रीतसर करुन व मोजणी फी चा भरणा केल्या नंतर मिळकतीची मोजणी करण्यात येत असते तसेच प्रत्यक्ष मोजणी झाल्यानंतर अतिक्रमण बाबतचा अहवाल जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर यांचेकडे सादर करण्यात येईल अशी माहिती देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे नमुद केले. त्याप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 11.4.2011 च्या प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलार्थीने नियमाप्रमाणे फी चा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असा निर्णय दिलेला होता. तथापी अपीलकर्त्याने मोजणी फी चा भरणा केला नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. म्हणून प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांनी दि. 22.2.2011 च्या पत्राने कळविल्या नुसार मोजणी फी चा भरणा करुन आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तीक होईल.

6. तथापी प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 12.1.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत म्हणजे दि. 11.2.2011पर्यंत अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 22.2.2011 च्या पत्राने म्हणजे सुमारे 10 दिवस विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या विलंबास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री लव्हारे हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु.2000/– ची शास्ती कां लादण्यात येवू नये याचा त्यांनी लेखी खुलासा करणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचे कडील दि. 22.2.2011 च्या पत्राने कळविल्यानुसार वर नमुद केलेल्या मिळकतीच्या मोजणी बाबत रीतसर अर्ज करुन व मोजणी फी भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

2) अपीलकर्त्यास त्यांच्या दि. 22.2.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसात माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही त्यानंतर दि. 22.2.2011 च्या पत्राने म्हणजे सुमारे 10 दिवस विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. या विलंबास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री लव्हारे हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु.2000/– ची शास्ती कां लादण्यात येवू नये याचा लेखी खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत सादर करावा.

3) प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रस्तुत प्रकरणात दि. 18.2.2011 रोजी प्रथम अपील दाखल झालेले होते. तथापी प्रथम अपीलाचा निर्णय दि. 11.4.2011 रोजी दिला. वास्तविक पाहता त्यांना 30 दिवसात प्रथम अपीलाचा निर्णय देणे आवश्यक होते. म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी भविष्यात याबाबतची पुनरावृत्ती करु नये अशी समजही त्यांना देण्यात येत आहे.

4) या निर्णयाची एक प्रत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री लव्हारे** यांचेकडे खुलासा करण्यासाठी पाठवावी व त्याची पोच त्यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2372-2374

जा.क्र.---------- दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1063 नाग/2011**

श्री दिपक यशवंतराव कानिटकर
राष्ट्रभाषा रोड वर्धा
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) डॉ. पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा पशुधन विकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय वर्धा
ता. जि. वर्धा
2) श्री प्रदिप थुल सहाय्यक पशुधन विकास अधिकारी
जन माहिती अधिकारी तथा पशुधन पर्यवेक्षक
पशु वैद्यकीय दवाखाना श्रेणी–2, रोठा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.10.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.7.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 20.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 25.4.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा पशुधन पर्यवेक्षक पशु वैद्यकीय दवाखाना श्रेणी–2, रोठा ता. जि. वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री थूल यांच्या दौ–याबाबत आणि दौ–यावर वरीष्ठ अधिका–या बरोबर केलेल्या चर्चा संदर्भात माहिती मागितलेली होती. सदरची माहिती 1 ऑगस्ट 2010 ते 31.12.2010 या कालावधीची त्यांनी मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी श्री थूल हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी डॉ. पाटील हे हजर होते.

4. जन माहिती अधिकारी श्री थूल यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 25.4.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अर्जाला अनुसरुन त्यांनी अपीलकर्त्यास दि. 20.5.2011 च्या पत्राने

आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून प्रथम अपील पशुधन विकास अधिकारी यांचेकडे दाखल केले. आणि प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही पुन्हा अपीलकर्त्यास दि. 17.6.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. अपीलकर्त्यास प्राप्त झालेल्या माहितीचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2376-2377

जा.क्र.————————— दि.................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1065 नाग/2011

श्री अमोल बळीराम नंदुरकर
मु. पो. नवेझरी
ता. तिरोडा जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती कार्यालय तिरोडा
ता. तिरोडा जि. गोंदिया
2) कु. एस. एस. खेरडे
जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत नवेझरी
ता. तिरोडा जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.10.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.9.2011 रोजी नोटीस काढून दि. 20.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत नवेझरी ता. तिरोडा जि. गोंदिया कु. एस. एस. खेरडे हया उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती तिरोडा यांच्या वतीने श्री डी. टी. खोब्रागडे हे उपस्थित आहेत.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी कु. एस. एस. खेरडे यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 27.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने ग्रामपंचायत नवेझरी मार्फत बांधण्यात येत असलेल्या व्यापारी संकुलाच्या बांधकामा विषयी 1 ते 13 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली. आणि अपीलकर्त्यास दि. 22.2.2011 रोजी माहितीचे शुल्क रु. 89/– भरणा करण्याबाबत

कळविले. त्यानुसार अपीलकर्त्याने दि. 27.2.2011 रोजी माहितीच्या शुल्काचा भरणा केला आणि अपीलकर्त्यास दि. 1.3.2011 रोजी रजिस्टर पोस्टाद्वारे संपूर्ण माहिती पाठविण्यात आली आणि त्याबाबतचा पोस्टाचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर दाखविला. त्यावरुन असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरणा केल्या नंतर दि. 1.3.2011 रोजी रजिस्टर पोस्टाद्वारे आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2379-2380

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1082 नाग/2011**

श्री सुधाकर केशवराव बागडे
रा. हाऊसिंग बोर्ड कॉलनी, बस स्टॅन्ड मागे,सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री व्ही. जे. नाईक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी(पंचायत)
पंचायत समिती सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर
2) श्री एफ. एम. साबळे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत चिचोली खापरखेडा
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.10.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.7.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.10.2011 रोजी नोटीस काढून दि. 24.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 20.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत चिचोली खापरखेडा ता. सावनेर जि. नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन 1 एप्रिल 2007 ते 17 डिसेंबर 2010पर्यंत ग्रामपंचायत चिचोलीच्या संदर्भात 1 ते 13 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहितीचे शुल्क भरण्यास पत्र 30 दिवसानंतर प्राप्त झाले म्हणून त्यांनी माहितीचे शुल्क भरणा केले नाही आणि त्यामुळे त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विस्तार अधिकारी पंचायत समिती सावनेर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये देखील त्यांना माहितीचे शुल्क भरुन घेवून माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रथम अपीलाचा निर्णय दिला. त्यामुळे त्या निर्णया मुळे त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत चिचोली खापरखेडा श्री एफ. एम. साबळे हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत समिती सावनेर श्री व्ही. जे. नाईक हे हजर होते.

4. जन माहिती अधिकारी श्री एफ. एम. साबळे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 20.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 28.12. 2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली 1 ते 13 मुद्यांची माहिती काढण्यात आली. आणि अपीलकर्त्यास दि. 20.1.2011 च्या पत्राने माहितीचे शुल्क रु. 916/– भरण्याबाबत कळविले. सदरचे पत्र अपीलकर्त्यास 10 दिवस विलंबाने मिळाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले. मात्र

माहितीचे शुल्क भरण्याचे दि. 20.1.2011 चे पत्र जन माहिती अधिकारी यांनी जावक क्रमांक 5 दि. 20.1.2011 रोजी पोस्टाद्वारे अपीलकर्त्यास पाठविल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर दाखविला. त्यावरुन असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविल्याचे दिसून येते.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील विस्तार अधिकारी पंचायत समिती सावनेर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील दि. 9.3.2011 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देवून माहितीचे शुल्क भरल्या नंतर माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचा निर्णय दिलेला आहे.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याचा दि. 20.12.2010 चा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. 28.12.2010 रोजी प्राप्त झाला होता. आणि त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी पोस्टाद्वारे अपीलकर्त्यास दि. 20.1.2011 च्या पत्राने माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविलेले असल्यामुळे अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीचे शुल्क भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी आणि जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने शल्क भरल्यानंतर त्यांना त्वरीत माहिती उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2378-2379

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1078 नाग/2011, अपील कमांक 1079 नाग/2011, अपील कमांक 1080 नाग/2011 व अपील कमांक 1081 नाग/2011**

श्री सुधाकर केशवराव बागडे
रा. हाऊसिंग बोर्ड कॉलनी, बस स्टॅन्ड मागे,सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**अपील कमांक 1078 नाग/2011**

1) श्रीमती ए. व्ही. कुर्वे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी(कषी)
पंचायत समिती सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर
2) श्री अमोल वाघ
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत गडमी
ता. सावनेर जि. नागपूर

**अपील कमांक 1079 नाग/2011**

3) श्री पवार
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत किरणापूर
ता. सावनेर जि. नागपूर

**अपील कमांक 1080 नाग/2011**

4) श्री अमोल वाघ
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत निमतलाई
ता. सावनेर जि. नागपूर

**अपील कमांक 1081 नाग/2011**

5) श्री अमीत गणपतराव तिमांडे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत खैरी पंजाब
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

( आदेश पारित दिनांक 24.10.2011 )

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.7.2011 रोजी अपील क्रमांक 1078 नाग/2011, अपील क्रमांक 1079 नाग/2011, अपील क्रमांक 1080 नाग/2011 व अपील क्रमांक 1081 नाग/2011 अशी चार द्वितीय अपीले राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दाखल केलेली आहेत. या चारही द्वितीय अपीलांमधे अपीलकर्ता हे एकच आहेत आणि मागितलेली माहिती देखील एकाच स्वरुपाचे आहे. म्हणून चारही द्वितीय अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यासाठी आयोगाचे कार्यालयातून दि. 5.10.2011 रोजी नोटीस काढून दि. 24.10.2011 रोजी चारही अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या चारही द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 29.1.2011 रोजी 1) जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत गडमी ता. सावनेर 2) जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत किरणापूर ता. सावनेर 3) जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत निमतलाई ता. सावनेर आणि 4) जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत खैरी पंजाब ता. सावनेर या चार जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन चारही ग्रामपंचायतच्या संदर्भात 1 एप्रिल 2007 ते 1 फरवरी 2011 या कालावधीची 1 ते 13 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. सदरचे चारही माहितीचे अर्ज त्यांनी पजीबध्द डाकेने चारही सचिवांकडे पाठविलेले होते. मात्र त्यांचे चारही माहितीचे अर्ज जन माहिती अधिकारी यांनी स्वीकारले नसल्यामुळे पोस्टमनने ते परत त्यांचेकडे पाठविले म्हणून त्यांना चारही जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विस्तार अधिकारी(कषी) पंचायत समिती सावनेर यांचेकडे दाखल केले. आणि चारही प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपीलकर्त्याने संबंधीत चारही जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीचे अर्ज नव्याने करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी आणि माहितीचे अर्ज प्राप्त होताच संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी 15 दिवसात अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिला. परंतू प्रथम अपीलाच्या निर्णयाने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस 1) जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत गडमी श्री अमोल वाघ 2) जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत किरणापूर तत्कालीन सचिव श्री पवार 3) जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत निमतलाई श्री

अमोल वाघ 4) जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत खैरी पंजाब श्री अमीत तिमांडे वरील प्रमाणे चारही जन माहिती अधिकारी आजच्या सुनावणीस हजर होते.

4. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 29.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे रजिस्टर पोस्टाद्वारे किंवा साध्या पोस्टाने देखील प्राप्त झालेला नाही. सदरचे माहितीचे अर्ज रजिस्टर पोस्टाद्वारे देण्यासाठी त्यांच्याकडे कोणताही पोस्टमन आलेला नाही त्यामुळे माहितीचे अर्ज स्वीकारण्यास नकार देण्याचा प्रश्न उदभवत नाही असे चारही जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी श्रीमती ए. व्ही. कुर्वे हया उपस्थित होत्या. त्यांनी देखील सुनावणीत सांगितले की अपीलकर्त्याचे चारही माहितीचे अर्ज संबंधीत जन माहिती अधिकारी तथा सचिव यांचेकडे प्राप्त झाले नाही. म्हणून प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये त्यांनी असे नमुद केले की अपीलकर्त्याने संबंधीत जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीचे अर्ज पुन्हा नव्याने सादर करावे आणि त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 15 दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे चारही प्रथम अपीलाचे निर्णय त्यांनी दिल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. आणि या मुद्यां विषयी विवेचन करतांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की वरील चारही जन माहिती अधिकारी तथा सचिव यांचेकडे रजिस्टर पोस्टाद्वारे पाठविलेले अर्ज प्राप्त झालेले नाही. किंवा चारही जन माहिती अधिकारी यांनी सदरचे माहितीचे अर्ज स्वीकारण्यास पोस्टमन जवळ नकार दिलेला नाही म्हणून अपीलकर्त्याने संबंधीत जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीचे अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल असे प्रथम अपीलीय अधिकारी श्रीमती ए. व्ही. कुर्वे यांनी आयोगापुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याचे चारही माहितीचे अर्ज संबंधीत जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत यांचेकडे रजिस्टर पोस्टाद्वारे प्राप्त झालेले दिसून येत नाही. मात्र सदरचे अर्जाच्या पाकीटांवर ''पोस्टमनने सुचना दिली मुदत संपली म्हणून सेंडरला वापस असा पोस्टमनने रीमार्क दिलेला आहे'' त्यावरुन सदरचे अर्ज ग्रामपंचायत कार्यालयात घेतलेले दिसत नाही म्हणून अपीलकर्त्यास आता विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक 1078 नाग/2011, अपील क्रमांक 1079 नाग/2011, अपील क्रमांक 1080 नाग/2011 व अपील क्रमांक 1081

नाग/2011 ही चार द्वितीय अपीले अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत वर नमुद केलेल्या चारही जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2381-2384

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1088 नाग/2011**

सौ. रेखा सुरेश कारेमोरे
96, रेंखांकुर, नेताजी नगर, गायत्री कॉलनी नागपूर
ता. जि. नागपूर – 35 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
ब्रम्हानंद उच्च प्राथमिक विद्यालय, वाठोडा रिंग रोड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.10.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक 12.6.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 10.10.2011 रोजी नोटीस काढून दि. 25.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती हजर आहेत. मात्र जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांच्या तर्फे श्री रामटेके उपशिक्षणाधिकारी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 25.4.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक ब्रम्हानंद उच्च प्राथमिक विद्यालय, वाठोडा रिंग रोड नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांच्या खात्यातील अर्जित रजा, परावर्तीत रजा व विशष रजा याबदद्ल 1 जुलै 1995 ते 31 डिसेंबर 2010 या कालावधीची माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडून दि. 31.5.2011 च्या पत्राने माहिती संदर्भात उत्तर प्राप्त झाले मात्र त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.24.6.2011 रोजी देण्यात आला. प्रथम अपीलाच्या निर्णयात जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक ब्रम्हानंद उच्च

प्राथमिक विद्यालय, वाठोडा रिंग रोड नागपूर यांनी अपीलकर्त्यास मागितलेली माहिती एक आठवडयाच्या आत देण्याचे आदेश दिले होते. त्यानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक ब्रम्हानंद उच्च प्राथमिक विद्यालय हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आले नाही. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांच्या वतीने उपशिक्षणाधिकारी श्री रामटेके हे सुनावणीस हजर होते. त्यांनी आयोगा पुढे सांगितले की अपीलकर्तीने शिक्षणाधिकरी यांच्याकडे दि. 26.5. 2011 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरची प्रथम अपीलाची सुनावणी दि. 10.6. 2011 रोजी घेण्यात आली. त्या वेळी मुख्याध्यापक हे सुनावणीस गैरहजर होते. तथापी सदरची शाळा ही अनुदानित असल्यामुळे अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती एक आठवडयाच्या आत उपलब्ध करुन देण्याचा प्रथम अपीलाचा निर्णय दिला तथापी मुख्याध्यापका कडून अपीलकर्तीस कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे श्री रामटेके यांनी आयोगापुढे सांगितले. त्याचप्रमाणे श्री रामटेके यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की प्रत्येक शाळेच्या शिक्षकांचे सेवा पुस्तक त्या त्या शाळेत तयार करण्यात येत असते आणि त्या सेवा पुस्तकात शिक्षकांच्या रेजेच्या सर्व नोंदी करण्यात येत असतात म्हणून मुख्याध्यापकानी अपीलकर्तीस पाहिजे असलेली माहिती त्यांच्या सेवा पुस्तकाच्या नोंदी वरुन उपलब्ध करुन देणे सहज शक्य आहे. म्हणून प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपीलाचा निर्णय दिल्या नंतरही मुख्याध्यापकानी अपीलकर्तीस माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. म्हणून जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचा याबाबत खुलासा मागणे आवश्यक आहे. तसेच सदरची शाळा ही अनुदानित असल्यामुळे अपीलकर्ती यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ती यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्तीस प्रथम अपीलाच्या निर्णया नुसार संपूर्ण माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्तीस दि. 25.4.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन प्रथम अपीलाच्या निर्णयात नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्तीस आवश्यक माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. मात्र त्यांनी अपीलकर्तीस अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत

नाही. म्हणून अपीलकर्तीस माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला दिसून येतो. म्हणून या विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 5000/– ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगापुढे सादर करावा अन्यथा सदरची शास्ती कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

3) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2386-2388

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1089 नाग/2011

श्री असंद्य भगवानदास रामटेके
द्वारा वार्ड सुधार कृती समिती, गाळे क.126 बी/8,
एम.आय.जी. हुडको कॉलनी नागपूर
ता. जि. नागपूर –14 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री क–हाडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक अयुक्त/वार्ड अधिकारी
महानगर पालिका आसीनगर झोन क.9 नागपूर
आसीनगर नागपूर
2) श्री रंगारी क्षेत्रीय अधिकारी
जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी,
महानगर पालिका आसीनगर झोन क.9 नागपूर
आसीनगर नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.10.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.7.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 10.10.2011 रोजी नोटीस काढून दि. 25.10.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 19.5.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, महानगर पालिका आसीनगर झोन क.9 नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन महानगर पालिकेच्या आसीनगर झोन क.9 मधील आरोग्य विभागास 1 ते 7 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. आणि सदरची माहिती सन 2007–2008, 2008–2009, 2009–2010 आणि 2010–2011 या चार वर्षाची सविस्तर माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 7.6.2011 च्या पत्राने असे कळविले की आपण माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत मागितलेली माहिती पुरवठा करण्या करीता प्रती पान रु.2/– प्रमाणे एकुण पेजेस 26880 होतात म्हणून त्या माहितीचे शुल्क रु. 53760/– महानगर पालिका आसीनगर झोन क.9 आरोग्य विभाग येथे

शुल्काचा भरणा करावा असे त्यांना कळविण्यात आले. मात्र माहितीच्या शुल्काची रक्कम मोठया स्वरुपात असल्यामुळे त्यांनी माहितीच्या शुल्काचा भरणा न करता प्रथम अपील सहाय्यक अयुक्त/वार्ड अधिकारी महानगर पालिका आसीनगर झोन क्र.9 नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र सहाय्यक अयुक्तांनी दि. 18.7.2011 च्या पत्राने त्यांना माहितीचे शुल्क रु. 53760/– भरण्या बाबत कळवून माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले. तथापी माहितीचे शुल्क हे जादा असल्यामुळे त्यांनी शुल्काचा भरणा केला नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगीतले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी श्री रंगारी हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक अयुक्त/वार्ड अधिकारी महानगर पालिका आसीनगर झोन क्र.9 नागपूर श्री क–हाडे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री रंगारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 19.5.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदरच्या माहितीच्या अर्जात सन 2007–2008, 2008–2009, 2009–2010 आणि 2010–2011 अशी चार वर्षाची विस्तृत स्वरुपाची आसीनगर झोन मधील आरोग्य विभागाची 1 ते 7 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे स्वरुप मोठया प्रमाणात असल्यामुळे सदर माहितीचे एकुण पेजेस 26880 होतात म्हणून प्रती पान रु.2/– प्रमाणे माहितीचे शुल्क रु. 53760/– भरण्या बाबतचे पत्र अपीलकर्त्यास दि. 7.6.2011 रोजी पाठविण्यात आले तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील सहाय्यक अयुक्त/वार्ड अधिकारी महानगर पालिका आसीनगर झोन क्र.9 नागपूर यांचेकडे दाखल केले. सहाय्यक अयुक्तांनी देखील दि. 18.7.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क रु. 53760/– भरण्या बाबत कळविले आणि त्या पत्रात असे देखील नमुद केले की प्रत्यक्षात आपणास जी माहिती पाहिजे असेल ती रेकॉर्ड मधून स्वतः बघावी व त्यानुसार जी आवश्यक असेल तीच माहिती शुल्क भरुन घ्यावे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविल्याचे सुनावणीत सांगीतले. सदरचे माहितीचे शुल्क भरण्या बाबतचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले की त्यांच्या माहितीच्या अर्जात त्यांनी चार वर्षाची माहिती मागितलेली आहे. मात्र त्यांना आता फक्त सन 2010–2011 या एकाच वर्षाची माहिती त्यांना पाहिजे आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्या त्यांच्या मागणी नुसार सन 2010–2011 ची माहिती त्यांच्या कडून शुल्क भरुन घेवून उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांनी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून सन 2010–2011 च्या माहितीचे निरीक्षण करुन घ्यावे आणि निरीक्षणा नंतर त्यांना त्यांना पाहिजे असलेल्या माहितीचे शुल्क भरुन घेवून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

